दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१३० शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

भाजपा आता साइड इफेक्ट्सच्या फेऱ्यात

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसली, तरी वातावरण निर्मिती मात्र निश्चितच तयार झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील विविध राजकीय पक्षांमधून इनकमिंग आणि आउटगोइंगचे सत्र सुरू झाले आहे. या प्रक्रियेचा सर्वात जास्त फटका भाजपला बसताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांत घडणाऱ्या घडामोडी पाहता भाजपमध्ये गाजावाजा करून सामील झालेले अनेक नेते पुन्हा एकदा आपल्या मूळ पक्षांमध्ये किंवा अन्य पक्षांमध्ये जाण्यास उत्सुक असल्याचे दिसत आहे.

केज तालुक्यात वीज कोसळून महिलेचा मृत्यू

केजः तालुक्यातील कोरेगाव शिवारात अचानक वीज कोसळून एका उसतोड मजूर महिलेचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी घडली. मुख्य रस्ता ते कोरेगाव या रस्त्यावर बाळासाहेब दराडे यांचे रस्त्यालगत शेतात घर आहे. रिमझिम पाऊस असल्याने सुशिला बाळासाहेब दराडे या घरासमोर दरवाज्यात बसल्या होत्या. यावेळी अचानक वीज कडकून त्यांच्या अंगावर कोसळली. सुशिला दराडे या उसतोड मजूर आहेत. यात त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूमुळे कोरेगावावर दुखाचा डोंगर कोसळला आहे.

घामाचा दाम मागणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सरकारकडं पैसा नाही!

मतदानावर डोळा ठेवून लाडक्या बहिण योजनेसाठी पैशाचे वाटप; शेतकरी नेते अजित नवले यांचा सरकारवर हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

मतदानावर डोळा ठेवून लाडक्या बहीण सारख्या योजनांसाठी सरकारकडे पैसा आहे. मात्र, घामाचे दाम मागणाऱ्या शेतकऱ्यांना द्यायला सरकारकडे पैसा नाही, ही अत्यंत संतापजनक बाब असल्याचे अजित नवले म्हणाले.

दूध आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर केलेले प्रतिलिटर पाच रुपये अनुदान दूध उत्पादकांना अद्यापही देण्यात आलेले नाही, ही अत्यंत संतापजनक गोष्ट असल्याचे मत व्यक्त करत किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. मतदानावर डोळा ठेवून लाडक्या बहीण सारख्या योजनांसाठी सरकारकडे पैसा आहे. मात्र, घामाचे दाम मागणाऱ्या शेतकऱ्यांना द्यायला सरकारकडे पैसा नाही, असे नवले म्हणाले. प्रत्येक गोष्टीवर आंदोलन करावे लागणे हे दुर्दैवाने शेतकऱ्यांचे प्रारब्ध बनल्याचे अजित नवले म्हणाले. सरकारने पुन्हा एकदा मान्य केलेले अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी शेतकऱ्यांवर आंदोलनाची वेळ आणू नये असेही अजित नवले म्हणाले. मागील अनुभव पाहता अनुदानाची नाटके दोन-तीन महिने चालतात आणि पुन्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले जाते. यावेळीही पुन्हा तसेच होईल अशी रास्त भीती शेतकरी व आंदोलकांच्या मनामध्ये आहे. त्यामुळे दीर्घकाळ उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव देण्याबद्दल जोवर धोरण घेतले जात नाही,

तोवर आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा ठाम निर्धार दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने घेतला होता. राज्य सरकारने जाहीर केलेल्या अनुदान वाटपातही अनेक गोंधळ अद्याप कायम आहेत. वर्षाच्या सुरुवातीला ◀◀ पान २ वर

दुधाला किमान ४० रुपये भाव मिळावा

दुधाला किमान ४० रुपये भाव मिळावा या मागणीसाठी राज्यभर दुध उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरत आहेत. वर्षभर सातत्याने तोटा सहन करावा लागल्याने दुध उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी असून राज्यात या नाराजीचा उद्रेक आंदोलनांच्या निमित्ताने पुढे येत आहे. उत्स्फुर्तपणे दुध उत्पादकांनी ठिकठीकाणी रास्तारोको, उपोषणे, निदर्शने सुरु केली आहेत. सरकारने या सर्व आंदोलनांची दखल घ्यावी व दुध उत्पादकांच्या मागण्या मान्य कराव्यात, असे आवाहन दुध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती सरकारला वारंवार करत आहे.

शरद पवारांनी झेड प्लस सुरक्षा नाकारली

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे (एस.पी.) अध्यक्ष शरद पवार यांनी झेड प्लस सुरक्षा नाकारली आहे. माध्यमांशी बोलत असताना ते म्हणाले, ''सरकारने दिलेली गाडी वापरणार नाही. माझ्या गाडीत कोणत्याही सुरक्षा अधिकाऱ्यांना बसवणार नाही''.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार यांना केंद्राने काही दिवसांपुर्वी झेड प्लस दर्जाची सुरक्षा पुरवली होती. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्र सरकारने हा निर्णय घेतला होता.

केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनी आढावा घेतल्यानंतर शरद पवारांना झेड प्लस सुरक्षा देण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार, त्यांना केंद्राची झेड प्लस दर्जाची सुरक्षा पुरवण्याचे आदेश गृहमंत्रालयाने दिले होते. यलो बुक ऑफ सिक्युरिटीनुसार शरद ◀◀ पान २ वर

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांचे बीड नगरीत अभूतपुर्व स्वागत

मंत्री छगन भुजबळ यांचे घेतले आशिर्वाद; ढोल ताशांचा गजर आणि फुलांच्या वर्षावाने बीड नगरी दुमदुमली!

बीड । प्रतिनिधी

राज्य मंत्री पदाचा दर्जा असलेल्या राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाची सुत्रे समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्याकडे सोपवण्यात आली आहेत. त्यांनी दि. २९ ऑगस्ट रोजी पदभार स्विकारल्यानंतर शुक्रवारी मंत्री छगन भुजबळ यांची नाशिक येथे भेट घेत आशिर्वाद घेतले. नाशिक ते बीड या दरम्यान जागोजागी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पदभार स्विकारल्यानंतर प्रथमच बीडमध्ये दाखल होताच जालना रोड पासून मोटार सायकल रॅलीने त्यांचे आगमन राष्ट्रवादी भवन, ◀◀ पान २ वर

पाऊल पडते पुढे...

ॲड. सुभाष राऊत यांनी विद्यार्थी दशेपासून चळवळीमध्ये काम केलेले आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आतापर्यंत अनेक आंदोलने करुन आवाज उठवला आहे. ओबीसी चळवळीसाठी त्यांचे योगदान मोठे असून बीडमध्ये झालेल्या ओबीसी महाएल्गार महामोर्चाचे त्यांनी नेतृत्व केले होते. राऊत यांची ही निवड सर्वसामान्य नागरीकांना दिलासा देणारी असून अता या पुढे योग्य व्यक्तीला रेशनचा लाभ मिळणार असल्याचेही म्हटले जात आहे. सुभाष राऊत यांच्या निवडीने सच्चा कार्यकर्त्याला न्याय देण्याचे काम राज्य सरकारने केले आहे.

दिव्यांगासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव तयार

मुंबईः दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव तातडीने तयार करावा,अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

मंत्रालयात दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीला आमदार बच्चू कडू, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकसचंद्र रस्तोगी,उपसचिव अशोक मांडे, राज्य सामाईक परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, ◀◀ पान २ वर

वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अवैध वाहतूक करणारा हायवा पकडला

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वाहतूक शाखेने आष्टी तालुक्यातील सांगवी येथे पांढऱ्या– निळ्या रंगाचा हायवा अवैध वाहतूक करताना रंगेहात पकडून या वाहनावर आष्टी पोलीस ठाण्यात कारवाई केली यासंदर्भात तहसीलदारांना पत्र देऊन याबाबत जिल्हा वाहतूक शाखेचे स.पोलीस.नि. एस.बी. सानप यांनी कळविले आहे.

दिनांक २९ ऑगस्ट रोजी रात्री नऊच्या सुमारास पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यासाठी आष्टी उपविभागात वाहतूक शाखेचे स.पोलीस.नि. एस.बी. सानप ए.एस.आय. शेख ,पो.हे .का .उबाळे, शिंदे, काकडे ,घोलप, दराडे ,मुंडे आदींनी रात्री अडीचच्या सुमारास सांगवी आष्टी गावच्या फाट्याजवळ आष्टी ते खडकत रोडवर सांगवी आष्टी ◀◀ पान २ वर

पंतप्रधान मोदी यांची शिवाजी महाराजांची माफी मागतानाही राहुल गांधींवर टीका

पालघर । प्रतिनिधी

शिवाजी महाराज हे आमचे दैवत असून, दैवतासमोर अनेकवेळा झुकले तरी आम्हाला त्याचे वावगे नाही. सिंधूदुर्गात मागील काही दिवसात जी घटना घडली. त्या घटनेबद्दल मनात खेद आहे. तसेच या घटनेबद्दल छत्रपती शिवाजी महाराज यांची पायाशी डोकं ठेवत त्यांची माफी मागत असल्याचे सांगत काहीजण स्वातंत्रवीर वि.दा. सावरकर यांचा अवमान करतात परंतु त्या बद्दल माफी मागायला तयार नाहीत. अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवाजी महाराज यांची माफी मागताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर केली.

वाढवण बंदराच्या भूमिपूजनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बोलत होते. यावेळी

पंतप्रधान मोदी यांनी शिवाजी महाराज यांची माफी मागितली. परंतु काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही टीका केली. पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत, ते आमचे देव आहेत. त्यामुळे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील घटनेबाबत मला दुःख आहे. त्यामुळे त्यांच्या पायाशी झुकून मी माफी मागतो. माझी शिवाजी महाराजांना दैवत मानणाऱ्यांनाही विनंती आहे की, या झाल्या घटनेबद्दल मी त्यांचीही ◀◀ पान २ वर



बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ५.५० क्विंटल			
	२,४००	३,०७०	२,७१७
ज्वारी/हायब्रिड : ३८.५० क्विंटल			
	२,१५०	२,५००	२,२८९
मूग : ४९.०० क्विंटल			
	७,०००	८,२००	७,८७६
तूर : १.०० क्विंटल			
	८,५००	८,५००	८,५००
उडीद : १९.५० क्विंटल			
	७,५००	८,०००	७,८१२
बाजरी:१८.५० क्विंटल			
	२,४६०	२,६११	२,५२१
चिंच/लोकलः २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीनः ३२.५० क्विंटल			
	४,१००	४,२५०	४,१८५
हरभराः ०.५० क्विंटल			
	६,४००	६,४००	६,४००

महावितरणचा मोठा निर्णय!

वीज कनेक्शन तोडलेल्या ३८ लाख ग्राहकांना अभय

१७८८ कोटी होणार माफ; थकबाकी भरण्यासाठी ६ हप्ते, १ सप्टेंबरपासून ही योजना लागू

पुणे । प्रतिनिधी

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील ३८ लाख घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी 'महावितरण'ची अभय योजना–२०२४ अंमलात येणार आहे. त्याअंतर्गत ग्राहकांना वीजबिलाच्या थकबाकीवरील व्याज आणि विलंब आकाराचे एकूण एक हजार ७८८ कोटी रुपये माफ करण्यात येणार आहेत. मात्र, थकबाकीदार ग्राहकांना त्यांच्याकडील थकीत वीजबिल तातडीने भरावे लागणार आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ग्राहकांना कारवाईपासून दिलासा देण्यासाठी १ सप्टेंबरपासून ही योजना लागू केली जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदारास वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. दरम्यान, थेट कायदेशीर कारवाई करण्याऐवजी सुविधा म्हणून ही सवलतीची योजना लागू करण्यात आली आहे. या संधीचा लाभ घेऊन ग्राहकांनी चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन 'महावितरण'ने केले आहे. राज्यातील 'महावितरण'च्या ३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ◀◀ पान २ वर

अग्रलेख

भाजपा आता साइड इफेक्ट्सच्या फेऱ्यात

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अद्याप जाहीर झाली नसली, तरी वातावरण निर्मिती मात्र निश्चितच तयार झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील विविध राजकीय पक्षांमधून इनकमिंग आणि आउटगोइंगचे सत्र सुरू झाले आहे. या प्रक्रियेचा सर्वात जास्त फटका भाजपला बसताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांत घडणाऱ्या घडामोडी पाहता भाजपमध्ये गाजावाजा करून सामील झालेले अनेक नेते पुन्हा एकदा आपल्या मूळ पक्षांमध्ये किंवा अन्य पक्षांमध्ये जाण्यास उत्सुक असल्याचे दिसत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील एक प्रभावशाली राजकीय व्यक्तिमत्त्व समरजीतसिंग घाडगे यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील मदन भोसले यांनीसुद्धा शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याबरोबर चर्चा करून भाजपला रामराम ठोकून शरद पवार यांच्या छत्राखाली जाण्याचे संकेत दिले आहेत. पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील प्रभावशाली राजकीय व्यक्तिमत्त्व हर्षवर्धन पाटील यांनीसुद्धा गेल्या दोन दिवसांपूर्वी शरद पवार यांची भेट घेतली असून दोन दिवसात ते निर्णय घेणार आहेत.

या सर्व घडामोडी घडत असताना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीसुद्धा सूचक वक्तव्य करून ज्यांना पक्षाबाहेर जायचे आहे त्यांना आम्ही थांबवू शकत नाही; पण त्यांनी थोडा संयम बाळगला तर त्यांच्या हिताचे काम होऊ शकते अशा प्रकारचे विधान केले आहे. म्हणजेच गेल्या काही वर्षांच्या कालावधीत भाजपमध्ये इतर राजकीय पक्षांतून जे इनकमिंग सुरू होते त्याचे साइड इफेक्ट्स आता दिसत आहेत. ज्या कालावधीत भाजपाचा मोठ्या प्रमाणात बोलबाला होता तेव्हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काही प्रमाणात शिवसेनेमधील अनेक नेत्यांनी आपापले पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. भाजपलासुद्धा विशिष्ट प्रदेशांमध्ये आपली ताकद वाढवण्यासाठी अशा प्रकारे इनकमिंगची गरजच होती. पश्चिम महाराष्ट्रामध्ये भाजपची मर्यादित ताकद असल्यानेच भाजपाने तेव्हा आपल्या राजकीय रणनीतीचा भाग म्हणूनच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रभावशाली नेत्यांना आपल्या पक्षामध्ये सामील करून घेतले होते. सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर या महत्त्वाच्या जिल्ह्यांमधील अनेक नेते तेव्हा भाजपमध्ये सहभागी झाले होते. कोकणामध्ये नारायण राणे यांनासुद्धा आपल्या पक्षामध्ये घेऊन भाजपने त्यांचा योग्य सन्मानही केला. नव्याने भाजपामध्ये आलेल्या अनेक नेत्यांना त्या त्या परिस्थितीत जरी योग्य सन्मान देण्यात आला असला, तरी आता बदलत्या परिस्थितीत यापैकी अनेक राजकीय नेत्यांना असुरक्षित वाटत असल्यास पुन्हा एकदा आउटगोइंगची प्रक्रिया सुरू झाली. महाराष्ट्रातील विद्यमान राजकारणात ज्या प्रकारे युती आणि आघाड्या निर्माण झाल्या आहेत ते पाहता प्रत्येक राजकीय नेत्यालाच आपल्या विधानसभा निवडणुकीतील भवितव्याचा विचार करून भूमिका घ्यावी लागत आहे.

जे आमदार ज्या पक्षाचे आहेत त्यांनाच पुन्हा एकदा त्या ठिकाणी उमेदवारी देण्याचा निर्णय होण्याची शक्यता असल्यानेच हा सर्व घोळ निर्माण झाला आहे. याच भूमिकेतून कागलमध्ये हसन मुश्रीफ यांनाच पुन्हा एकदा अजित पवार गटाकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्याने समरजीतसिंग घाडगे यांना आपल्या राजकीय भवितव्याची चिंता वाटत असल्याने त्यांनी शरद पवार यांच्या गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. तशीच मानसिक स्थिती मदन भोसले यांची सुद्धा आहे. त्या ठिकाणीसुद्धा अजित पवार गटाच्या विजयी आमदारालाच म्हणजेच मकरंद पाटील यांनाच पुन्हा एकदा उमेदवारी मिळण्याची शक्यता असल्याने मदन भोसले यांनाही आपल्या राजकीय भवितव्याची चिंता वाटत नसेल तरच नवल. खरे तर मदन भोसले यांचे पिताश्री प्रतापराव भोसले आणि शरद पवार यांचे राजकीय वैर संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. तरी राजकीय भवितव्याचा विचार करून मदन भोसले यांनी शरद पवार यांच्या छत्रछायेखाली जाण्याचा निर्णय घेतल्याचे संकेत मिळत आहेत. हर्षवर्धन पाटील यांची मानसिकतासुद्धा अशाच प्रकारची आहे.

मराठवाडा, विदर्भ आणि इतर भागातही अशाच प्रकारची मानसिकता दिसून येत आहे. महायुतीमध्ये सध्या तीन घटक पक्ष असल्याने अनेकांना तिकिटाबाबत अनिश्चितता वाटत असल्याने या सर्व इनकमिंग आणि आउटगोइंग घडामोडींचा वेग वाढला आहे. २०१४ किंवा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीचा विचार करता भाजपाच्या चिन्हावर निवडून आलेल्या अनेक आमदारांची किंवा दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या नेत्यांची नावे पाहिली तर ते नेते पूर्वी इतर कोणत्या राजकीय पक्षातील प्रभावशाली नेते होते असेच लक्षात येते. पण बदलत्या राजकीय परिस्थितीत या सर्वच राजकीय नेत्यांना असुरक्षित वाटू लागल्यानेच या सर्व घडामोडी घडू लागल्या आहेत.

महाराष्ट्रात सत्तेवर येण्यासाठी भाजपने इतर राजकीय पक्षांतील महत्त्वाच्या नेत्यांना आपल्या पक्षामध्ये सहभागी करून घेण्याची जी रणनीती आखली होती तिला गेल्या दहा वर्षांच्या कालावधीत जरी यश येताना दिसत असले तरी आता या रणनीतीची दुसरी बाजूसुद्धा समोर येऊ लागली आहे. अद्याप महायुतीच्या घटक पक्षांची विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत कोणतीही चर्चा सुरू नसतानाच या घडामोडी घडत असल्याने त्याची दखल भाजपला घ्यावीच लागणार. प्रत्यक्ष जागावाटपाचा फॉर्म्युला ठरल्यानंतर अधिक प्रमाणात असंतोष वाढून तेव्हा आउटगोईंगचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

शाळेत अनुचित घटना घडल्यास मुख्याध्यापकावर कायदेशीर कारवाई–जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

जालना । प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांचा शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शाळेच्या परिसरात तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच शाळेत स्वसंरक्षणासह गुड टच, बॅड टच याबाबत धडे देण्यात यावेत. शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेत अनुचित प्रकार घडला असल्याचे लक्षात येताच संबंधितांवर तात्काळ गुन्हा नोंद करावा. शाळेत एखादी अनुचित घटना ०५ घडूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास संबंधित मुख्याध्यापकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सुरक्षा विषयक उपाययोजना कार्यशाळा पार पडली, याप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, जि.प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, अतिरिक्त पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, मंगला धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने यात तडजोड करण्यात येवू नये. मुख्याध्यापकासह शिक्षकांनी विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सतत संपर्कात रहावे तसेच दोघांच्याही सुरक्षितेवर लक्ष द्यावे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून मुख्याध्यापकांच्या कक्षाजवळ तक्रार पेटी बसवावी तसेच त्यामधील नियमित तक्रार पाहण्यापासून ते तक्रारींचे निराकरण करण्याचे काम स्वत: मुख्याध्यापकांनी करावे. शाळांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीपुर्वी स्थानिक पोलिस विभागाकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. खाजगी शाळेच्या बसवर संबंधित व्यवस्थापनाने महिला मतदनीसाची प्राधान्याने नियुक्ती करावी. तसेच विद्यार्थी सुरक्षा समित्याचा आढावा गटविकास अधिकाऱ्यांनी नियमितपणे घ्यावा. शाळेच्या परिसरात दर्शनीय भागावर चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक ११२ नमुद करावा. शाळेतील मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री समिती तसेच विद्यार्थी सुरक्षा समितींने नेमून दिलेली कार्ये विहीत कालावधीत पार पाडणे आवश्यक असल्याच्या सुचनाही यावेळी दिल्या. तसेच शाळेत अनुचित घटना घडल्यास तात्काळ गुन्हा नोंद केल्यास सर्व गोष्टींना सामोरे जावे लागेल याची मनात भिती बाळगू नका, या सर्व प्रकरणात जिल्हा प्रशासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यशाळेस जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, प्रशालेचे मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, साधन व्यक्ती यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

कृषी प्रदर्शनात खिलार कोसा जातीचा बैल विशेष आकर्षण

दुसऱ्या दिवशी हजारो शेतकरी व विद्यार्थ्यांनी घेतला प्रदर्शनाचा लाभ

आष्टी । प्रतिनिधी

दुसऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात सांगली येथील खिलार कोसा जातीचा बैल शेतकऱ्यांचे विशेष लक्ष वेधून घेणारा ठरला आहे. हजारों शेतकरी व विद्यार्थ्यांनी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला.

आजचा विद्यार्थी हा देशाचा उद्याचा आधारस्तंभ आहे. भारत कृषीप्रधान देश आहे. देशाची अर्थव्यवस्था सर्वस्वी शेतीवर अवलंबून आहे. आष्टी सारख्या दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना शेतीविषयक नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, अत्याधुनिक पद्धतीने शेती कशी करावी याबाबत ज्ञान मिळावे यासाठी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी डॉ. स्वामिनाथन राज्यस्तरीय दुसऱ्या कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यासह देशाची भावी पिढी असणारे शालेय विद्यार्थी यांनी या कृषी प्रदर्शनाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला आहे. हजारो विद्यार्थी प्रदर्शन पाहण्यासाठी येत आहेत. कृषी प्रदर्शनांमध्ये पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, त्याचप्रमाणे विदर्भ या ठिकाणाहून विविध प्रकारचे स्टॉल आलेले आहेत. उत्कृष्ट व गुणवत्ता धारक फळे , वेगवेगळे ट्रॅक्टर, दूध डेअरी संबंधी उपकरणे, यामध्ये गाईचे दुध काढणे मशीन, कृषी महाविद्यालय तयार केलेले गांडूळ खत व इतर खाण्याची पदार्थ, सांधेदुखी वरील गुणकारी औषधे, सोलर सिस्टिम, खते, बी - बियाणे, औषधे तसेच शेतीविषयक माहिती असणारे वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके, बॉडी मसाज करणे मशिन , वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे, आवळ्यापासून बनवलेले वेगळे पदार्थ, तसेच खवय्यांसाठी वेगवेगळ्या विभागातील वेगवेगळे पदार्थांची कृषी प्रदर्शनात रेलचेल आहे. सांगली येथील खिलार कोसा जातीचा बैल हे शेतकऱ्यांचे विशेष आकर्षण आहे. महेश आयुर्वेदिक महाविद्यालयातर्फे येणारे शेतकऱ्यांची मोफत तपासणी केली जात आहेत. कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांचे स्वागत कक्षामध्ये युवा नेते अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, चेअरमन राजेश धोंडे यांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. १ तारखेपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनाचा परिसरातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन युवा नेते अजयदादा धोंडे यांनी केले आहे.



पॅरालिम्पिक: भारताच्या पदकांची हॅट्ट्रिक!

प्रीती पालची १०० मीटर शर्यतीत 'कांस्य'वर मोहोर

पॅरिस । प्रतिनिधी

भारताची स्टार ॲथलीट प्रीती पाल हिने पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मध्ये कांस्य पदकाला गवसणी घालून इतिहास रचला आहे. तिने ट्रॅक आणि फील्ड प्रकारात भारताला पदक मिळवून दिले. १७ व्या उन्हाळी पॅरालिम्पिक खेळांमधील भारताचे हे तिसरे पदक आहे. याआधी अवनी लेखरा आणि मोना अग्रवाल यांनी नेमबाजीत अनुक्रमे सुवर्ण आणि कांस्यपदके जिंकून भारताचे पदक खाते उघडले.

प्रीती पालने महिलांच्या टी-३५ १०० मीटर प्रकारात १४.२१ सेकंदाच्या वैयक्तिक सर्वोत्तम वेळेसह कांस्यपदक जिंकले. २३ वर्षीय प्रीतीचे कांस्यपदक पॅरिस पॅरालिम्पिकमधील पॅरा ॲथलेटिक्समधील भारताचे पहिले पदक आहे. चीनच्या झोउ जियाने (१३.५८) सुवर्णपदक तर गुओ कियानकियान (१३.७४) हिने रौप्यपदक जिंकले. टी-३५ ही स्पर्धा हायपरटोनिया, ॲटॅक्सिया, ऍथेटोसिस आणि सेरेब्रल पाल्सी सारख्या विकार असलेल्या खेळाडूंसाठी आहे.

आगामी निवडणुकांसाठी पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे-खा.डॉ.काळे

जालना । प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकतीने सामोरे जात महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असे आवाहन खा. डॉ.कल्याण काळे यांनी आज येथे बोलतांना केले.

आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा व शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जालना शहरातील गुरू गणेश भवनमध्ये आज शुक्रवारी बूथ कमिट्या आणि बीएलए साठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन खा. डॉ. कल्याण काळे आणि आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ.काळे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस तर्फे प्रशिक्षण देण्यासाठी नीरज जैन,

विशाल, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी आमदार सुरेशकुमार जेथलीया, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद, राजेंद्र राख, राम सावंत,विजय चौधरी,दिनकर घेवंदे, नंदाताई पवार, प्रभाकर पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना डॉ.कल्याण काळे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले तसेच परिश्रम विधानसभा निवडणुकीत घेण्यासाठी आतापासूनच सज्ज व्हावे. मतदार हा महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याने विधानसभा निवडणुकीत देखील विजय आपलाच होईल असा विश्वास खा.डॉ. कल्याण काळे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी बोलतांना आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत किल्ला लढवला. कार्यकर्त्यांच्या बळावर आणि जनतेची भक्कम साथ यामुळे लोकसभा निवडणुकीत खासदार काळे यांनी मोठया मताधिक्याने विजय मिळवला. विधानसभा निवडणुकीत देखील विजयाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी सज्ज व्हावे असे आवाहन आ.कैलास गोरंटयाल यांनी केले.प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थीत असलेले नीरज जैन व इतर मान्यवरांनी उपस्थीत कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा दिली.यावेळी अण्णासाहेब खंदारे, शेख इब्राहिम, राम कुऱ्हाडे,अब्दुल रफीक, योगेश पाटील, शिवप्रकाश चितळकर, शेख शमशोड्डीन, शेख अझहर, नारायण वाढेकर, जावेद अली, बाबासाहेब सोनवणे, गणेश वाघमारे, कलीम खान, बासेद कुरेशी, जावेद बेग यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १वरून...

घामाचा दाम मागणाऱ्या

दोन महिने दिले गेलेल्या अनुदानात अनेक शेतकरी वंचित आहेतच, मात्र नंतर जाहीर करण्यात आलेल्या अनुदानाबाबतही अनेक गंभीर शंका आहेत. १ जुलै ते १० जुलै या काळातील अनुदान अनेक संस्थांनी दिलेले नाही. अनेक खासगी संस्थांनी तर अद्याप २७ रुपयांचा दर देणे सुरू ठेवले आहे.

दिव्यांगासाठी स्वतंत्र विद्यापीठ

तंत्रशिक्षण संचालक डॉ.विनोद मोहितकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, या विद्यापीठाच्या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध होतील, आणि त्यामुळे त्यांच्या कौशल्यांचा विकास होईल.

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष

बार्शी रोड येथे झाल्यानंतर बीड शहरवासियांच्या वतीने त्यांचे अभुतपुर्व स्वागत करण्यात आले. त्यांनतर रात्री उशिरापर्यंत त्यांच्या निवास्थानी शुभेच्छा देण्यासाठी समर्थकांनी मोठी गर्दी केली होती. ॲड. सुभाष राऊत हे ओबीसी नेते व मंत्री छगन भुजबळ यांचे अत्यंत जवळचे विश्वासू आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अजित पवार, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनराव भुजबळ, कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे, माजी खासदार समीर भुजबळ, माजी आमदार पंकज भुजबळ यांच्या शिफारसीनुसार समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांची अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) निवड करण्यात आली. गुरुवारी अन्न आयोगाच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर शुक्रवारी त्यांचे बीड शहरांमध्ये आगमन झाले. छत्रपती संभाजीनगर पासूनच विविध ठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. बीड शहरात आगमन झाल्यानंतर जालना रोड येथून भव्य मोटरसायकल रॅलीने राष्ट्रवादी भवन बार्शी रोड बीड येथे आगमन होताच ढोल - ताशांचा गजर, डीजेचा हर्ष उल्हास, जेसीबी मधून होणारा फुलांचा वर्षाव, फटाक्यांची आतिषबाजी आणि क्रेनमधून स्वागतासाठी आणलेला भव्य हाराने ॲड. सुभाष राऊत यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बीड जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक, ओबीसी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी आणि विविध समाजातील नागरिकांनी परिसर खचाखच भरला होता. ''जय ज्योती जय क्रांती'', ''सुभाषराव तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है'',''ओबीसी का नेता कैसा हो! सुभाष राऊत जैसा हो!'',''छगनराव भुजबळ यांचा विजय असो'', ''पालकमंत्री धनंजय मुंडे यांचा विजय असो!''अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. राष्ट्रवादी भवन येथील सत्कार सोहळा संपन्न झाल्यानंतर ॲड. सुभाष राऊत यांच्या निवासस्थानी त्यांच्या सौभाग्यवती यांच्यासह घरातील महिला भगिनींनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. आईचे आणि वडील कै. किसनराव राऊत यांचे शुभ आशीर्वाद घेऊन त्यांनी घरामध्ये प्रवेश केला. यावेळी बंधू डॉ. सुधीर राऊत, संदीप दुधाळ, महेश दुधाळ, दै. मराठवाडा साथीचे बीड जिल्हा प्रतिनिधी ॲड. संदीप बेदरे, परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, धनगर समाजाचे अध्यक्ष अंकुश निर्मळ, अमर ढोणे, संतोष रासवे, उगलमुगले, निखिल शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

शरद पवारांनी झेड

पवारांना सुरक्षा पुरवण्यात आली होती. या सुरक्षेअंतर्गत केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) ५५ सशस्त्र जवानांचे पथक शरद पवारांच्या सुरक्षेत तैनात असणार होते. आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांचे वेगवेगळ्या जिल्ह्यांत दौरे सुरू झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी पवारांनी मनोज जरांगे पाटील यांची उपोषणस्थळी भेट घेतली होती, त्यावेळी रस्त्यात काही आंदोलकांनी त्यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले होते. तसेच, आगामी काळात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यातील राजकारण तापण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पवारांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला होता.

पंतप्रधान मोदी यांची शिवाजी महाराजांची

माफी मागतो असेही यावेळी ते म्हणाले. मात्र देशात असेही काहीजण आहेत, ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले. त्यांच्यावरही टीका करतात, त्यांचा अपमान करतात. ते लोक न्यायालयात जाऊन न्यायिक लढाई लढतात पण स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्यावर केलेल्या टीकेची माफीही मागत नाहीत. मात्र आमच्यावर संस्कारच वेगळे आहेत. त्यामुळे देशाच्या आदर्श व्यक्तींसमोर आम्हाला माफी मागायला संकोच वाटत नाही, पण कदाचित त्यांच्यावर संस्कार झाले नसतील म्हणून ते भारतमातेच्या सुपुत्रावर केलेल्या टीकेची माफीही मागत नाहीत अशी उपरोधिक टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे नाव न घेता मोदींनी केली.

पंतप्रधान मोदींची माफी विरोधकांनी फेटाळली

महाविकास आघाडीने पंतप्रधान मोदींच्या माफीला धुडकावून लावले आहे. जयंत पाटील म्हणाले, भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाला महाराजांनी कधीच माफी दिली नव्हती. आमचा महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी दाखवलेल्या वाटेवर चालतो. त्यामुळे साहेब, महाराष्ट्र या चुकीला माफी देऊ शकणार नाही. प्रायश्चित अटळ आहे. जय शिवराय. काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, निर्भीडपणे माफी मागायला पंतप्रधानांनी कच खाल्ली आहे. खरेतर त्यांनी किंतू परंतु करत माफी मागितली. सावरकर आणि शिवाजी महाराज यांची तुलना करण्याचा प्रयत्न तर झाला नाही ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सरकारकडून काँग्रेस नेत्यांची धरपकड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्यावेळी आंदोलनाच्या तयारीत असलेले काँग्रेस नेते आणि कार्यकर्त्यांची पोलिसांनी शुक्रवारी सकाळपासून धरपकड सुरु केली होती. यामुळे खासदार आणि मुंबई काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्या संतापाचा पारा चांगलाच चढला. मुंबई पोलिसांनी सकाळपासून वर्षा गायकवाड यांना त्यांच्या घरीच स्थानबद्ध करुन ठेवले होते. याबद्दल संताप व्यक्त करताना वर्षा गायकवाड यांनी म्हटले की, मी फरार आहे का, अतिरेकी आहे का, मी एखाद्या गुन्ह्यात सामील आहे का? फडणवीस साहेब तुम्ही काय वागताय? जिथे शासन केले पाहिजे, तिकडे तुम्ही शासन करत नाही आणि विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहात. मात्र, आम्ही शिवरायांचे मावळे आहोत, असे वर्षा गायकवाड यांनी ठणकावून सांगितले.

वाहतूक शाखेच्या पोलिसांनी अवैध

गावातून पांढऱ्या- निळ्या रंगाचा हायवा आल्याचे दिसताच त्याला थांबवुन तपासणी केली असता हायवा क्रमांक एम. एच. १४३८७४ चा चालक पोपट दिलीप हळनूर याला थांबून हायवाची तपासणी केली असता यामध्ये पाच ब्रास रॉयल्टी चुकवून आणलेली वाळू ताब्यात घेण्यात आली. हायवाचा चालक जामखेड येथील असून त्याची आष्टी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणातील हायवा आणि सदर चालकास आष्टी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या संदर्भात दंडात्मक कारवाई करण्यासाठी तहसीलदारांनाही पत्राद्वारे कळवले आहे.

महावितरणचा मोठा

ग्राहकांसाठी ही योजना लागू असणार आहे. थकित बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ असणार आहे. ३८ लाख ग्राहकांकडून 'महावितरण'ला मूळ बिलाची पाच हजार ४८ कोटी रुपयांची रक्कम तसेच एक हजार ७१९ कोटी रुपये व्याज आणि ६९ कोटी ९० लाख रुपये विलंब आकार येणेबाकी आहे. तथापि, या वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी थकित बिलाच्या मूळ रकमेवरील व्याज आणि विलंब आकाराच्या स्वरुपातील दंड माफ करण्यात येणार आहे.

सहा हप्त्यांत विभागणी

मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सवलत ग्राहकांना मिळेल. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एकरकमी थकित बील भरतील, त्यांना १० टक्के सवलत देण्यात येईल. उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.

ग्राहकांना असा घेता येईल लाभ...

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून ऑनलाइन पद्धतीने अभय योजनेचा लाभ घेता येईल. 'महावितरण'च्या मोबाइल ॲपवरूनही लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००२३३३४३५ किंवा १८००२१२३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.३१ ऑगस्ट २०२४

भिऊ नकोस दिदी पोलिस काका तुझ्या पाठीशी...

छेडछाड अत्याचार करणाऱ्यांची गय केली जाणार नाही – सपोनि मंगेश साळवे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आपले मुले, मुली आंगणवाडी, शाळा, कॉलेज मध्ये शिकत असताना ती सुरक्षित राहावी म्हणून अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत 'पोलीस काका, आणि 'पोलीस दिदी' हा अभिनव उपक्रम चालु केलेला आहे. त्या अंतर्गत प्रत्येक शाळेवर जाऊन विद्यार्थ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सखोल मार्गदर्शन करून जनजागृती केली जात आहे. आपल्या मुला मुलींचे शिक्षण सुरक्षित वातावरणात पूर्ण व्हावे म्हणून यापुढे त्यांच्यावर अन्याय/अत्याचार करणाऱ्याची आजिबात गय केली जाणार नसून कठोर कारवाई केली जाईल असे प्रतिपादन अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले.

त्याचाच एक भाग म्हणून आपण प्रत्येक अंगणवाडी/शाळा/कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने अंभोरा पोलीस स्टेशन मार्फत बॅनर तयार केलेले आहे. ते बॅनर प्रत्येक शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर अथवा ज्या ठिकाणहून प्रत्येकाला दिसेल असे शाळेच्या आवरात बसवणार आहोत.सदरच्या बॅनर मुले अल्पवयीन मुला-मुलींमध्ये जनजागृती होईल तसेच असे कृत्य करणाऱ्यावर होणाऱ्या कडक कारवाईमुळे अशा विकृतीना नक्कीच जरब बसेल असे ही सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी बोलताना सांगितले.

भोलोबा गीत स्पर्धेच्या निमित्ताने महिलांना व्यासपीठ उपलब्ध झाले - विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

भोलोबा (फेर) गीत स्पर्धांसारख्या कार्यक्रमातुन परंपरा जोपासण्याचा प्रयत्न होत असुन या निमित्ताने महिलांना व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. महिलांचा मिळणारा मोठा प्रतिसाद लक्षात घेवुन यावर्षीपासुन गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे भव्य आयोजन करणार असल्याचे प्रतिपादन विजयसिंह पंडित यांनी केले. नागपंचमी निमित्त आयोजित केलेल्या भोलोबा (फेर) गीत स्पर्धेच्या पारितोषीक वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी परिक्षकांसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्या संघांनी पुन्हा एकदा आपल्या कलाविष्काराचे प्रदर्शन करुन उपस्थितांची मने जिंकली.

शारदा प्रतिष्ठानच्या टिपरे महोत्सवात यावर्षी भोलोबा (फेर) गीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या स्पर्धेत गौराई कलाश्री ग्रुप, बसवेश्वर कॉलनी, गेवराई यांनी प्रथम क्रमांक मिळवत ५ हजार रुपये रोख व सन्माचिन्ह, शिवपाठ ग्रुप, भवानी पेठ, गेवराई यांनी व्दितीय क्रमांक मिळवत ३ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह, तळेवाडी महिला मंडळ, तळेवाडी यांनी तृतीय क्रमांक मिळवत २ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह तर उत्तेजनार्थ पारितोषीक सौ. लक्ष्मीबाई उत्तमराव मोटे आणि सौ. संगिताताई ढाकणे यांना प्रत्येकी १ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह देवुन गौरविण्यात आले. शारदा प्रतिष्ठानच्या पारितोषीक वितरण समारंभाला स्पर्धा आयोजक विजयसिंह पंडित, परिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुभाष निकम, परिक्षक शाहीर विलास सोनवणे, विष्णूप्रसाद खेत्रे, राजेंद्र बरकसे यांच्यासह प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, प्राचार्या डॉ. रजनी शिखरे, जयभवानीच्या संचालिका सौ. संध्याताई मराठे, संजय गांधी निराधार समितीच्या सदस्या शाहीनभाभी पठाण, नगरसेवक राधेशाम येवले, राष्ट्रवादी महिला

भोलोबा (फेर) गीत स्पर्धेचा पारितोषीक वितरण समारंभ संपन्न

आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ. मुक्ताताई आर्दड यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलतांना विजयसिंह पंडित म्हणाले की, गेवराई शहराला टिपरे आणि सोंग या लोककलेची सुमारे शंभर वर्षाची परंपरा आहे, लोककलेची ही परंपरा जोपासण्याचा आम्ही जाणीवपुर्वक प्रयत्न करत असुन त्याला लोककलाकारांकडुन मोठा प्रतिसाद मिळत आहे. नागपंचमीच्या निमित्ताने भोलोबा गीत स्पर्धेचे आयोजन करुन महिलांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासोबतच पुरातण संस्कृतीचे जतन करण्याचा आमचा या मागील उद्देश आहे. परंपरा जोपासणारा तालुका म्हणुन गेवराईची नवी ओळख आता होवु लागली आहे. अतिशय शिस्तबद्ध आणि सुरक्षीत कार्यक्रम होत असल्यामुळे माताभगिनी सुद्धा मोठ्या विश्वासाने या कार्यक्रमात सहभागी होत आहेत, हीच आमच्या कामाची पावती असल्याचे प्रतिपादन विजयसिंह पंडित यांनी केले. परिक्षक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुभाष निकम म्हणाले की, टिपरे ही परंपरा असलेले भारतातील गेवराई हे एकमेव शहर आहे. या लोककलेला जतन करण्याचे काम शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातुन विजयसिंह पंडित यांनी केले आहे. महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेता त्यांनी यावर्षीपासुन गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगतांना ॲड. निकम यांनी आपल्या भाषणात टिपरे आणि भोलोबा गीत स्पर्धेच्या निमित्ताने आलेल्या अनेक अनुभवाचे वर्णन आपल्या भाषणातुन करत स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी स्पर्धकांना मार्गदर्शन केले. पारितोषीक विजेत्या गौराई कलाश्री ग्रुपच्या सौ. वैशालीताई पाटील यांनी प्रातिनिधीक स्परुपात मनोगत व्यक्त करतांना विजयसिंह पंडित आणि शारदा प्रतिष्ठानचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या डॉ. रजनी शिखरे यांनी केले, आभार भाऊसाहेब नाटकर यांनी मानले तर सुत्रसंचलन सुधीर गाडे यांनी केले. कार्यक्रमात अतिशय उस्फुर्तपणे विजेत्या सर्व संघांनी आपली कला यावेळी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कर्याक्रमाला सौ.किरण दाभाडे, सौ.जयश्री दाभाडे, सौ.संगिता सागडे, सुरय्या पटेल, रुमईसा फातेमा पटेल, सौ.शिलाताई पैठणे, सौ.प्रणिता रुकर, सौ.अनिता काळे, सौ.मिनाक्षी गचांडे, सौ.रत्नमाला फुलझळके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या पदाधिकारी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पालात राहणारे गोरगरीब हक्काच्या निवाऱ्यासाठी रस्त्यावर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पालात राहणारे गोरगरीब कुटुंब हक्काच्या निवा-यासाठी रस्त्यावर उतरले. घरकुल मंजूर करून गैरसोय दूर करावी अशी मागणी त्यांनी शुक्रवारी शासनाकडे केली आहे.

अतिशय गरीब परिस्थितीतील कुटुंबांना हक्काचे व कायमस्वरूपी घरकुल नाहीत. छोटा, मोठा व्यवसाय करून प्रपंच चालवून पोट भरत असलेल्या व्यक्तींना स्वतःचे हक्काचे घर नसल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते नाही. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने ते पाल ठोकून आपले जीवन जगत आहेत. शासनाने अशा व्यक्तींना कायमचा निवारा द्यावा अशी मागणी जातीअंत संघर्ष समितीचे प्रमुख ब्रबुवाहन पोटभरे यांनी शुक्रवार, दि.३० ऑगस्ट रोजी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. अंबाजोगाई शहरात गेल्या कित्येक वर्षांपासून काही भटके विमुक्त लोक सरकारी जागेत, रस्त्यालगत वास्तव्य करून राहातात. सर्वांना घरे या योजनेचा फायदा अद्याप यांना झालेला नाही. शासनाने जर हक्काचा निवारा दिला तर यांच्या मुला बाळांच्या जीवनास स्थैर्य येईल. मांग वडगावचे पारधी ही पालात राहतात, त्यांच्या आजोबा वडील व चुलते यांचे निघृण खुन त्या गावात झाले. पण, या पारधी लोकांचे सरकारने पुरार्वसन केले नाही. पालात राहणारे काही लोकांकडे अंबाजोगाईचे आधारकार्ड, विद्युत मीटर, मतदान यादीत नावे आहेत, तरी ही या लोकांना मूलभूत

अशा कोणत्याही सुविधा नाहीत, नगरपरिषद प्रशासनाने सदरील कुटुंबाच्या वास्तव्याची प्रत्यक्ष पाहणी करून घरकुलांचे प्रस्ताव तयार करण्यासाठी सूचना द्याव्यात. अथवा पुढील आंदोलन उग्र अशा स्वरूपाचे राहील.असा इशारा कॉ.पोटभरे यांनी दिला आहे. निवेदनावर कॉ.बब्रुवाहन पोटसरे,राजाराम कुसने,आशोक सोनवणे गुलेनाज बेगम, शेख बाबा, संतोष पवार, रोहिणी मस्के,अनिता रसाळ, बापु गोमसाळे यांच्या स्वाक्ष्या आहेत.

कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेत इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार समोर ठेवून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट रोजी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या मेळाव्याची सुरूवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दिप प्रज्ज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित प्रमुख अतिथींचे स्वागत शाळेतील विद्यार्थीनी यांनी स्वागतपर गीताने केले. या तालुकास्तरीय मेळाव्याचे आयोजन शासनाकडून कोणकोणत्या योजनांची अंमलबजावणी केली जाते. या योजना सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत पोहोंचल्या पाहिजेत. या उद्देशाने या योजनेचा प्रचार व प्रसार होण्यासाठी करण्यात आले होते. या मेळाव्यात विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या आश्रमशाळा, विद्यानिकेतन शाळा, गुणवंत मुला-मुलींसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, इतर मागास विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजना, मोदी आवास योजना, कन्यादान योजना, यशवंतराव चव्हाण वसाहत योजना, स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार, ऊसतोड कामगारांच्या मुला- मुलींसाठी निवासी आश्रमशाळा योजना, मॅट्रीक पूर्व शिष्यवृत्ती योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना, वसंतराव नाईक तांडा सुधार वस्ती योजना अशा विविध योजनांसंदर्भात निरीक्षक लक्ष्मण बारगजे यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. ओबीसी महामंडळाचे कासाणे यांनी ही मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक एस.ए.राठोड यांनी केले. यावेळी श्रीमती भवरे मॅडम, पडीले सर, ग्रामसेवक माचवे यांनी समायोचित मार्गदर्शन केले. तर ए.आर.राठोड यांनी अध्यक्षीय समारोप केला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी अनिलराव रामधन राठोड (सचिव, श्री.संत विठ्ठलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, परळी वै.), प्रमुख मार्गदर्शक लक्ष्मण बारगजे (निरीक्षक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, बीड.), प्रमुख पाहुणे श्रीमती तपकीरे मॅडम (सहाय्यक प्रशासन अधिकारी, पं.स,अंबाजोगाई.), श्रीमती भवरे मॅडम (गृहपाल, शासकीय मुलींचे वसतीगृह), श्रीमती सुनंदा गर्जे (सरपंच, अंबलवाडी), भगवान हारे (सरपंच, जवळगाव), बालाजी हरिश्चंद्र पडीले (मुख्याध्यापक, आश्रमशाळा, साकुड), एस.आर.राठोड (मु.अ.प्रा.वि.), एस.ए.राठोड (मु.अ.माध्यमिक विभाग) आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश देशमुख यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ए.एस.तांबोळी यांनी मानले. यावेळी विविध गावचे ग्रामसेवक, सरपंच, विविध योजनांचे लाभार्थी तसेच आश्रमशाळा साकुड व कै.वसंतराव नाईक आश्रमशाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, नागरिक, महिला, युवक उपस्थित होते.

पान ६ वरून...

रामगिरी महाराजला अटक

अपशब्दामुळे संपूर्ण देशात जातिय तणाव निर्माण झालेले आहे, या कारणांमुळे अनेक शहरांसह बीड शहर पोलिस स्टेशनमध्ये सुद्धा रामगिरी विरोधात कायदेशीर तक्रार नोंद होऊन गुन्हा दाखल झालेला आहे, पण आत्तापर्यंत वादग्रस्त महाराजला अटक केलेले नाही, किंवा त्यांचावर पुढची कारवाई झालेली नाही म्हणून समाजात रोष निर्माण होत आहेत, म्हणून रामगिरी महाराजला त्वरित अटक करण्यात यावी असे निवेदन लेखी स्वरूपात मा. पोलिस अधीक्षक साहेबांना देण्यात आले आहेत, अटक मध्ये दिरंगाई झाली तर मुस्लीम समाजाच्यावतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिष्टमंडळाने दिला आहे, यावेळी नगरसेवक सैय्यद इलियास,नगरसेवक मुन्नाभाई इनामदार, सुनील धायडे,शेख मोहसीन,अझर भाई,शेख सलाम,शेख जहीर,सय्यद फरहान,मोमीन शहबाज, अझर भाई,अखिल भाई,सलमान अली,नजीर भाई,अश्फाक भाई,आमेर पाशा यांच्यासह अनेक मुस्लिम बांधव उपस्थित होते,

दिंद्रुड येथे सर्व समावेशक

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख ओमप्रकाश शेटे तर उद्घाटक म्हणून भाजपा नेते रमेश आडसकर उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष मिलिंद आव्हाड यांना निमंत्रित करण्यात आले आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नामांकित पदाधिकारी-अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक चंदन कांबळे व गायिका राणी मस्के यांचा समाज प्रबोधनावर गीतांचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी या सार्वजनिक जयंती महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक बाबा कांबळे, जयंती उत्सव समिती अध्यक्ष सिद्धेश्वर ठोंबरे, अध्यक्ष शिवहार कटारे, अंगद तांबे, नाना देशमाने, राजू मेंडके, अक्षय सोनवणे,अक्षय चांदबोधले, बाबू कांबळे, महेश लोखंडे, परशुराम लोखंडे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

कडा शहरात संत सेना महाराज

अन्नधान करण्यात आले संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त सर्व कडा शहरातुन पालखीची मिरवणूक काढण्यात आली या वेळी सोमनाथ पवळ, अवि पवळ, सुरज पवळ ,अक्षय पवळ विठ्ठल पवळ ,रमेश पवळ, पांडुरंग भुजबळ ,ज्ञाना पवळ बाळू पवळ ऋषिकेश पवळ ,महेश पवळ,गोवर्धन पवळ आदी उपस्थित होते .

जैतापूर येथे श्री संत भगवान

महाप्रसादाचे आयोजन सरपंच छाया भागवत दराडे यांच्यावतीने करण्यात आले होते. कैलास दराडे, अशोक दराडे, प्रकाश दराडे, हनुमंत दराडे,महेश चौरे,विष्णू दराडे, गणेश दराडे ,सुशील दराडे, तुकाराम दराडे,हनुमंत दराडे, गोविंद दराडे ,सुरेश दराडे,संजय चव्हाण,गोविंद चव्हाण, अनिल दराडे,बाळासाहेब राठोड,व्यंकटी दराडे, बबन दराडे,गोविंद दराडे, बिबीशन दराडे,राजेभाऊ दराडे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजन केले होते

खोलेश्वर मल्टीस्टेटला

दिला जाणारा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार हा खोलेश्वर मल्टीस्टेट दिंद्रुड संस्थेस जाहीर झालेला आहे. या पुरस्काराचे वितरण दिनांक ८ व ०९ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या सहकार परिषदेमध्ये केंद्रीय निबंधक आनंद कुमार झा यांच्या शुभहस्ते व फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांच्या उपस्थितीमध्ये वितरित केले जाणार आहे. खोलेश्वर मल्टीस्टेट या संस्थेला यापूर्वी देखील अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले असून खोलेश्वर मल्टीस्टेटने महाराष्ट्रातच नव्हे देशात नाव लौकिक केले आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मां. दिलीपराव पारेकर साहेब यांचे अचुक मार्गदर्शन व मुख्य कार्यकारी अधिकारी विलास काका पारेकर यांच्या कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाने संस्थेने उल्लेखनीय कार्य करत पुरस्काराचा मान संस्थेस प्राप्त केला आहे. मार्च २०२३ अखेर ९० कोटी ठेवी, ६० कोटी कर्ज वाटप, १५० कोटी पेक्षा अधिक व्यवसाय पूर्ण केला आहे. केवळ व्यवसाय वाढ हे उद्दिष्ट न ठेवता सुरक्षित व्यवसाय या उद्देशाने अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवींना सुरक्षा देण्याचे काम संस्थेने केले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात खोलेश्वर मल्टीस्टेटने एक आदर्श संस्था म्हणून मराठवाड्यात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तसेच केवळ व्यवसाय न करता संस्था सामाजिक,धार्मिक व सांस्कृतिक कार्यात नेहमीच अग्रेसर असते. या सर्व बाबीची दखल घेत राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटने संस्थेला सन २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर केला आहे. संस्थेचे अध्यक्ष मां. दिलीपराव पारेकर यांनी सदरील पुरस्कार संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारी, नित्यनिधी प्रतिनिधी, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक सभासद यांना समर्पित केला आहे.

क्रांतिवीर प्रीतीलता वड्डार कन्यारत्न पुरस्काराने सृष्टी मेंढे यांचा आज पुण्यात होणार गौरव

गेवराई । प्रतिनिधी

वडार भूषण कै डॉ लक्ष्मणराव देगलूरकर यांची जयंती आणि विमुक्त दिनानिमित्त पुणे यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा महिला क्रांतिवीर प्रीतीलता वड्डार प्रेरणा कन्यारत्न पुरस्कार बीड येथील सृष्टी कृष्णकुमार मेंढे यांना

जाहीर झाला असून, आज दिनांक ३१ ऑगस्ट रोजी पुणे येथे आयोजित भव्य कार्यक्रमात त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येत आहे. बीड येथील आर्किटेक इंजिनियर कृष्णकुमार मेंढे यांची कन्या असलेल्या सृष्टी मेंढे या पुण्यातील नामांकित कॉलेज सिओईपी चे प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे एम टेक अर्बन प्लॅनिंग शिक्षण नागपूर विद्यापीठात झाले असून यात त्या गुनानुक्रमे सर्वप्रथम आल्या आहेत. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी नोकरी मिळवली असून त्यांचे हे कार्य वडार

समाजासह सर्व समाजातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरले आहे. या कार्याची दखल घेऊन वडार भूषण कै लक्ष्मणराव देगलूरकर पुस्तक प्रकाशन समिती पुणे यांच्या वतीने दिला जाणारा महिला क्रांतिवीर प्रीतीलता वड्डार प्रेरणा कन्यारत्न पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांचे वडील कृष्णकुमार मेंढे आणि भाऊ प्रणव मेंढे हे दोघेही मास्टर आर्किटेक आहेत तर आई सौ मधुराताई मेंढे या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे वितरण आज ३१ ऑगस्ट २०२४ रोजी पुणे येथील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर गुंजन थिएटर जवळ येरवडा पुणे येथे सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी उद्घाटक म्हणून सोलापूर समाज कल्याण उपायुक्त नागेश चौगुले, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुखदेव पवार, निवृत्त शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे तर स्वागताध्यक्ष म्हणून उद्योजक सिताराम शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. लेखक संशोधक आणि जातीव्यवस्थेचे अभ्यासक संजय सोनवणी, माजी महापौर हनुमंतराव भोसले, माजी महापौर मुकारी आण्णा अलगुडे, महाराष्ट्र राज्य वडार समाज संघाचे अध्यक्ष मुकुंद पवार, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त भारत निंबाळकर, माजी नगरसेवक ॲड किशोर शिंदे, किशोर विटकर, आनंद अलकुंटे, विनोद बोरसे, सौ शारदाताई ओरसे, सौ निताताई मंजाळकर, शिवाजी शिंदे, सौ सुनीताताई साळुंखे, सौ सुनंदाताई देवकर, राहुल भोसले, सौ संगीताताई पवार, अपर्णाताई कुऱ्हाडे यांच्यासह अखिल वडार समाज संघटना प्रदेश सचिव शामराव पवार, सुरक्षा अधिकारी पुणे मनपा राकेश विटकर, वडार पँथर संघटना प्रदेशाध्यक्ष दयानंद इरकल, वडार जन आंदोलन अध्यक्ष संगीताताई पवार, तहसीलदार लताताई धोत्रे, वैद्यकीय अधिकारी कल्पनाताई शिंदे, उदय कुमार, रमेश शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सृष्टी मेंढे यांच्यासोबतच कालिदास भांडेकर, आकाश सुपारे, राम मेटकर, शंकर चौगुले, धनश्री माने, रुपेश कुराडे, दिलीप जेठे, आकाश पवार, आप्पाराव विटेकर यांनाही विविध क्षेत्रातले पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

मनसेच्या वतीने रोषणपुरी फाटा येथे दोन तास रास्ता रोको आंदोलन

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक खेडी गावांमध्ये लोकांना ये जा करण्यासाठी रस्ताच नाही तर काही ठिकाणी थातूरमातूर रस्त्याचे काम करून गुत्तेदारासह अभियंता,कर्मचाऱ्यांचे पोट भरण्यासाठी थातूर मातूर काम केले जातात.माजलगाव तालुक्यात असे काही ठिकाण आहेत जे की रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात आलेले नाहीत.काही ठिकाणचे खड्डे बुजवण्यात आले नाही तर काही ठिकाणी केलेल्या कामाचे काम हे निकृष्ट दर्जेआचे झाले आहेत असे ठिकाणे खालील प्रमाणे रोशनपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण करणे राष्ट्रीय महामार्ग ते रोशनपुरी नागडगाव रोड रस्त्याचे खड्डे बुजवणे, राष्ट्रीय महामार्ग ते रोशनपुरी दोन महिन्यापूर्वी झालेल्या डांबरीकरणाची कॉलिटी कंट्रोल तर्फे तपासणी करणे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण निर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय महामार्गावरील रोषणपुरी फाटा येथे दोन तास रोको आंदोलन करण्यात आले.या वेळी सुमीत ईगळे, नामदेव,रामा सरवदे,बालाजी जाधव,सौरभ वाघमारे,आबा शेटे, अभिजीत जाधव, संजय जाधव, अनिल कांबळे, करण ढगे,आदीसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.या रास्ता रोकोमुळे राष्ट्रीय महामार्गावरील रोषणपुरी फाटा येथे मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले पतसंस्थेमुळे महिलांचे दैनंदिन जीवनमान उंचावले आहे – सुनीता मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेमुळे महिलांच्या दैनंदिन जीवनात आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावले असल्याचे मत पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. त्या पतसंस्थेच्या सन २०२३-२४ सालच्या ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचा आर्थिक अहवाल सादर करताना बोलत होत्या.यावेळी पतसंस्थेच्या सचिव खडकभावी शोभा बाबू , तसेच उपाध्यक्षा डॉ. धाकडे राजश्री राहुल , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , सविता विजय रापतवार , सरवदे संगीता विष्णू, फारोखी परवीन नुजहत , चोकडा जमुना जयप्रकाश या संचालिकांसह शाखा व्यस्थापक सागर कंगळे हे उपस्थित होते.

पतसंस्थेच्या २०२३-२४ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात अंबाजोगाई वासीयांचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवी तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पतसंस्थेचे व्यवस्थापक सागर कंगळे यांनी संस्थेच्या मागील वर्षाचा इतिवृत्त सादर केला. ज्यामध्ये संस्थेच्या आर्थिक वर्षातील विविध विषयांवर चर्चा घेवून त्यांना मान्यता मिळवली. तसेच मा अध्यक्षांच्या अनुमतीने ऐनवेळी आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

पतसंस्थेचा वार्षिक अहवाल अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी सादर केला . आपला भारत देश हा पुरुष प्रधान संस्कृतीचा देश आहे . यामुळे समाजात वेळोवेळी महिलांना दुय्यम

स्थान देताना दिसून येत आहे. याचाच परिणाम म्हणून बहुतांश महिला घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडलेली आढळून येत असते. कुटुंबात तसेच दैनंदिन व्यवहारात महिलांना आर्थिक स्वायत्तता नसते. हीच बाब हेरून संस्थापक राजकिशोर मोदी व सौ सुनीता मोदी यांनी केवळ महिलांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेची निर्मिती केली. या पतसंस्थेमुळे महिलांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता मिळून त्यांचा व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावल्यामुळे त्यांचे जीवनमान देखील उंचावल्याचे सुनीता मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. पतसंस्थेच्या आर्थिक सहायाच्या माध्यमातून अनेक महिलांनी त्यांचे छोटे मोठे व्यवसाय सुरु केल्याने त्यांना व त्यांच्यासोबतच इतर महिलांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे अनेक महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता मोदी यांचे आभार व्यक्त करत आहेत. पतसंस्थेची आर्थिक स्थिती विशद करताना त्यांनी ३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही २३३१ एवढी असल्याचे सांगितले . तसेच संस्थेचे भागभांडवल हे रुपये २७ लाख एवढे जमा असल्याचे नमूद केले .३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेकडे ४ कोटी ३३ लाखांच्या ठेवी जमा झाल्या असून त्यामधून समाजातील महिलांना ३ कोटी २६ लाख रुपये कर्जाचे वितरण करण्यात आल्याचे पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई पिपल्स बँकेत सावित्रीमाई फुले पतसंस्थेने ०२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे . त्याच बरोबर ३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेस ०५ लाख ३५ हजारांचा रुपयांचा नफा झाल्याचे देखील अध्यक्षा सौ. सुनीता मोदी यांनी सांगताना झालेल्या नफ्यातून पतसंस्थेच्या सर्व सभासदांना ७% लाभांश देण्याचे याप्रसंगी जाहीर केले. पतसंस्थेच्या यशाचे सर्व श्रेय हे मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्यासह पतसंस्थेच्या सर्व संचालिका, ठेवीदार ,सभासद आणि महिलांनी घेतलेल्या कर्जाचा वेळेवर परतावा यालाच द्यावे लागेल असेही सौ.मोदी म्हणाल्या. आजमितीला संस्थेत ०३ कर्मचारी तसेच ०१ नित्य निधी ठेव प्रतिनिधी असून ते देखील संस्थेच्या कामात मोलाचा वाटा उचलत असल्याचे अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. या वार्षिक सर्वसाधारण सभेतील उपस्थित सर्व संचालिका, सभासद,व खातेदारांचे आभार उपाध्यक्षा डॉ राजश्री धाकडे यांनी व्यक्त केले. या वार्षिक सर्वसाधारण सभेस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेचे अनेक सभासद , ग्राहक तथा हितचिंतक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

शेतकऱ्यांनो पुढील २ दिवसात शेतातील कामे उरका

राज्यात 'या' तारखेला मुसळधार पावसाचा अंदाज

शेतकर्यांसाठी एक महत्वाची बातमी पुढे आली आहे. शेतकरी बांधवांना येत्या दोन दिवसांमध्ये शेतातील सर्व कामे उरकून घ्यावीत, असे आवाहन हवामान अभ्यासकांनी केलं आहे. कारण येत्या दोन ते सहा सप्टेंबर दरम्यान राज्यभरामध्ये जोरदार पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केलाय. तसेच जायकवाडी धरण ही १००% भरणार असल्याचेही डख यांनी सांगितले आहे.

जायकवाडी धरण शंभर टक्के भरणार

पंजाब डख यांनी आज एक हवामान अंदाज व्यक्त केला असून ज्यानुसार शेतकऱ्यांनी उसाला खत टाकणे, उडीद मूग काढून घेणे, असे कामे करून घेण्याचे सांगितले आहे. कारण राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यांमध्ये २ सप्टेंबरपासून मुसळधार पावसाला सुरुवात होणार आहे. तर तो पाऊस ६ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. पावसाची सुरुवात विदर्भातून होणार आहे. या पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ होऊन ते पाणी जायकवाडी धरणात येणार आहे. सध्या जायकवाडी धरण ७० टक्के भरले असून २ ते ३ दिवसात ते ८० टक्केच्या वर जाणार असून सप्टेंबर

महिन्यात शंभर टक्के भरणार आहे. त्यानंतर पाण्याचा विसर्ग करावा लागणार आहे. धरणाखाली असलेले दहा ते बारा बंधारे या मुसळधार पावसाने भरणार असल्याचे ही पंजाब डख यांनी सांगितले आहे.

पावसामुळं पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार

सप्टेंबरमध्ये होणाऱ्या पावसामुळं सोयाबीन, मका, कापूस यासारख्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होणार आहे. तर जमिनीत ओलावा राहून खरीप हंगामातील गहू, हरभरा या पिकांना त्याचा फायदा होऊ शकतो. दरम्यान, हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी भारतात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा देशात आत्तापर्यंत ७ टक्के पाऊस अधिक झाला आहे.

आज कसं असले महाराष्ट्रातील राज्यातील हवामान?

गेल्या काही दिवसापासून राज्यात चांगला पाऊस होत आहे. बहुतांश जिल्ह्यात चांगला पाऊस झाला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आजही राज्याच्या विविध भागात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आजही पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्याला देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याचबरोबर संपूर्ण विदर्भात देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. आज या भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळं या पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असं अवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

पावसानूसार कसं असावं पिकांच नियोजन?

पेरणी झालेल्या पिकामध्ये कोणती व्यवस्थापनाची कामे करावीत याविषयी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीने दिलेल्या शिफारशीची माहिती आपण घेणार आहोत.

पाऊस झालेल्या ठिकाणी उगवून आलेल्या सोयाबीन आणि ज्वारी पिकात विरळणी व नांग्या भरुन घ्याव्यात. जुलैच्या पहिल्या आठवडयानंतर ज्वारीची पेरणी करु नये. ज्वारीची उशिरा पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव होऊन ताटाची संख्या घटते. पेरणी न केलेल्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर म्हणजेच ७५ ते १०० मिलीमीटर पाऊस झाल्यानंतरच बिजप्रक्रिया करून बाजरी ची पेरणी करावी. बाजरी पिकाची पेरणी २० जुलैपर्यंत करता येते. सुरू ऊसाची पक्की बांधणी केली नसल्यास ती करून घ्यावी व नत्राचा चौथा हप्ता द्यावा. हळदीमध्ये आंतरपीके घेताना पहिल्या तीन ते साडेतीन महिन्यापर्यंत काढणी होईल अशा प्रकारची आंतरपीके निवडावीत. यामध्ये पालेभाज्या सारख्या आंतरपिकांचा समावेश असावा. पाऊस झालेल्या ठिकाणी नविन संत्रा, मोसंबी, डाळिंब, चिकू बागेची लागवड करावी. नवीन लागवडीसाठी फळपिकांच्या शासकीय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. लिंबुवर्गीय पिकांत कोळी किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास या किडीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टीन १० हजार पीपीएम ३ ते ५ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मृग बहाराच्या संत्रा, मोसंबी बागेत अन्नद्रव्यांची कमतरता दिसून येत असल्यास चिलेटेड झिंक ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत ओलावा बघून भेंडी, कारले, भोपळा, दोडका या बियाद्वारे लागवड केल्या जाणाऱ्या भाजीपाला पिकांची लागवड करावी. गादीवाफ्यावर तयार केलेल्या भाजीपाला पिकांच्या रोपांना ४५ दिवस झाले असल्यास पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत ओलावा बघून वांगी, मिरची, टोमॅटो या भाजीपाला पिकांची पूनर्लागवड करावी. काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकाची काढणी करून घ्यावी.

शंखी गोगलगायीच्या व्यवस्थापनासाठी पाऊस पडल्यानंतर सर्व शेतकऱ्यांनी सामूहिक मोहिम राबवून गोगलगायी गोळा करून प्लास्टीकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मिठ अथवा चूना टाकून नष्ट कराव्यात. पेरणी न केलेल्या भागात पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर बिजप्रक्रिया करूनच मका या चारा पिकाची पेरणी करावी. मका या चारापिकासाठी ८० किलो नत्र ४० किंलो स्फुरद आणि ४० किलो पालाश प्रति हेक्टरी खत मात्रा पेरणीच्यावेळी द्यावी.

सोयाबीन पिकावरील खोडमाशीचे नियंत्रण करण्यासाठी करा हे सोपे उपाय

सध्या होणारा सततचा रिमझीम पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे सोयाबिन पिकावर खोडमाशी चा प्रादुर्भाव दिसुन येत आहे.खोडमाशीमुळे सोयाबीनच्या उत्पादनात ५० टक्क्यापर्यंत घट येऊ शकते. त्यामुळे शेतकरी बंधुनी वेळीच जागरूक राहून एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करणे गरजेचे आहे.

खोडमाशीचा प्रादुर्भाव कसा ओळखायचा?

सोयाबीनच्या पिकात खोडमाशीचा प्रादुर्भाव कधीही होऊ शकतो, खासकरून पिक सुरू झाल्यावर. जर तुम्हाला असे दिसले की, झाडाचा शेंडा सुकून खाली झुकला आहे, तर ते खोडमाशीच्या प्रादुर्भावाचे लक्षण असू शकते.झाडाचा शेंडा खाली झुकून सुकणे हे याचे प्रमुख लक्षण आहे. याशिवाय, झाडाच्या खोडातून पिवळी अळी दिसणे आणि पानांवर अळीचे नुकसान दिसणे हीही लक्षणे आहेत. मात्र, झाड मोठे झाल्यावर हा किडा झाडात शिरला तर त्याची लक्षणे लगेच दिसून येत नाहीत. अशा वेळी फक्त झाडाच्या खोडावर एक छिद्र दिसू शकते. या किड्यामुळे झाड हिरवे राहूनही शेंगा भरत नाहीत. जर या किड्यावर नियंत्रण ठेवले नाही तर उत्पादनात ५०% पर्यंत घट होऊ शकते.

शेतकऱ्यांना पिकांवरील कीड आणि रोगांचे नियंत्रण कसे करायचे याची माहिती देण्यासाठी कृषी विभाग विविध उपाययोजना करत आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार यांनी सोयाबीन पिकावर होणाऱ्या

खोडमाशीच्या प्रादुर्भावावर मात करण्यासाठी काही महत्त्वाचे उपाय सुचवले आहेत. खोडमाशी: जर तुमच्या सोयाबीनच्या पिकावर खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून आला तर क्लोरॅनट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी. हे कीटकनाशक वापरा. हे कीटकनाशक १० लिटर पाण्यात २.५ मिली प्रमाणात मिसळून फवारणी करावी. पावसाची शक्यता असल्यास फवारणी करू नये. पाने खाणारी अळी: या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्यास हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन (कामगंध) सापळे लावून या अळीला आकर्षित करून नियंत्रणात ठेवता येते. जर या अळीचा प्रादुर्भाव झालाच तर ५ टक्के निंबोळीचा अर्क किंवा आर्थिक नुकसान होण्याच्या टप्प्यावर पोहोचल्यावर प्रोफेनोफॉस ५० ईसी हे कीटकनाशक वापरा. हे कीटकनाशक १० लिटर पाण्यात २० मिली प्रमाणात मिसळून फवारणी करावी. पावसाची शक्यता असल्यास फवारणी करू नये.

सोयाबीन पिकांचे एकात्मिक व्यवस्थापन:

वाणांची निवड: काही विशिष्ट प्रकारचे सोयाबीन या रोगाला अधिक बळी पडतात. म्हणून, आपल्या शेतात अशा प्रकारचे वाण लावू नयेत. आपल्या भागातील कृषी विद्यापीठाने शिफारस केलेले रोगप्रतिकारक वाणच लावले पाहिजेत. पांढऱ्या माशीचे नियंत्रण: पांढरी माशी हा पिवळा मोझेंक रोग पसरवणारा एक कीटक आहे. या कीटकांचे प्रमाण कमी करण्यासाठी हेक्टरी १० ते १५ पिवळे चिकट सापळे लावले पाहिजेत. हे सापळे पांढऱ्या माशांना आकर्षित करतात आणि त्यांना अडकवून ठेवतात. निंबोळी अर्काचा वापर: निंबोळीचा अर्क एक नैसर्गिक कीटकनाशक आहे. हा अर्क पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी प्रभावी ठरतो.

कपाशीवरील बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन

कपाशीवरील बोंडअळीमुळे पिकांचे मोठे नुकसान होत होते. मात्र, २००२-०३ मध्ये बोंडअळीस प्रतिकारक असणाऱ्या बीटी कापसाला व्यापारी तत्त्वावर संमती भारतात मिळाली. त्यात एकेरी 'क्राय १ एसी' हे जनुक कपाशीत टाकण्यात आले. त्यानंतर बीटी कापसाच्या एकेरी जनुक असलेल्या (क्राय १ एसी, क्राय १ सी, क्राय १ एफ, विप ३ ए) आणि दुहेरी जनुक (क्राय १ एसी + क्राय २ एबी) असलेल्या संकरित वाणांची लागवड सुमारे ९५ टक्क्यापर्यंत पोचली. त्यामुळे कपाशीला अमेरिकन बोंडअळी, ठिपक्यांची बोंडअळी आणि गुलाबी बोंडअळी या तीन प्रकारच्या बोंडअळ्यांपासून संरक्षण मिळू लागले. मात्र, नवीन अहवालानुसार गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमध्ये बीटी कपाशीचा प्रभावीपणा तंत्रज्ञानाच्या बिघाडामुळे कमी झाला आहे. या कपाशीवरही बोंडअळीचा (मुख्यतः गुलाबी बोंडअळी) प्रादुर्भाव दिसून येत आहे. गतवर्षी महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, औरंगाबाद, जळगाव, जालना, बुलडाणा आणि अकोला जिल्ह्यांत बीटी कपाशी पिकात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळला. काही अहवालानुसार मागील दोन वर्षांत अमेरिकन बोंडअळी 'बोलगार्ड २' मध्ये गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी आढळून आली आहे.

१. अमेरिकन बोंडअळी अमेरिकन बोंडअळीच्या लहान अळ्या सुरवातीला कापसाची पाने खातात व नंतर पात्या व कळ्यांना नुकसान पोचवितात. मोठ्या अळ्या बोंडांना छिद्र पाडून आतील भाग खाऊन पोकळ करतात व अळीचा अर्धा भाग बोंडाच्या बाहेर असतो. छिद्राभोवती अळीची विष्ठा साचलेली असते. प्रादुर्भावग्रस्त पात्या व लहान बोडे नंतर गळून पडतात. या अळीने केलेले छिद्र अनियमित गोल व तुलनात्मकदृष्ट्या मोठी असतात. अळी पात्या व फुलांवर प्रामुख्याने आढळून येते. तसेच ती आपल्या जीवनकाळात ३०-४० बोंडांचे नुकसान करू शकते. अळी प्रादुर्भावग्रस्त बोंडे सडून गेल्याने कापूस उत्पादनात सुमारे ४० टक्के घट होते.

ऋतूनिहाय अळ्या येण्याचे प्रमाण वेगवेगळे असते. या किडीचा प्रादुर्भाव ऑगस्टपासून नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत वाढू शकतो. अमेरिकन बोंडअळी प्रामुख्याने विदर्भामध्ये अतिघन पद्धतीने लागवड केलेल्या गैरबीटी हिरसुटम या वाणावर आढळते. काही अहवालानुसार 'बोलगार्ड २' मध्येही अमेरिकन बोंडअळीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. २. ठिपक्यांची बोंडअळी ठिपक्यांची बोंडअळी कपाशीला पात्या येण्याच्या अगोदर प्रथम कोवळ्या शेंड्यांना छिद्र पाडून पोखरून खाते. असे शेंडे सुकून नंतर वाळून जातात. या किडीच्या प्रादुर्भावामुळे पात्या अर्धवट उमलतात व गळून पडतात. एक अळी अनेक बोंडांवर छिद्र पाडत असल्याने अळ्यांच्या संख्येच्या तुलनेत नुकसानग्रस्त बोंडाचे प्रमाण वेगळे असते. नुकसानग्रस्त बोंडावर संसर्गजन्य जिवाणू व बुरशीचा प्रादुर्भाव वाढतो. कोरडवाहू कपाशीमध्ये या अळीमुळे होणारे नुकसान १० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकते. ३. गुलाबी बोंडअळी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव सुरवातीला फुलावर असतो. त्यामुळे फुले पूर्ण उमलत नाहीत. ती अर्धवट उमललेल्या अवस्थेत गळून पडतात. अंड्यातून निघालेली अळी बोंडात शिरते. हे छिद्र बंद होते. कोवळ्या बोंडातील सर्वच भाग ती खाऊन टाकते, तर जुन्या बोंडातील ३-४ बिया ही अळी खाते. एका बोंडामध्ये एकापेक्षा जास्त अळ्या असू शकतात. गुलाबी बोंडअळीने प्रादुर्भाव झालेली फुले म्हणजेच 'डोमकळी'सारखी दिसतात. परिपूर्ण बोंडामध्ये लहानसे छिद्र दिसून येते. गुलाबी बोंडअळी बोंडात राहून सरकीचेही नुकसान करते.

गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव पेरणीनंतर ९० दिवसांनी येतो. मात्र, ऑगस्ट महिन्यात (पेरणीनंतर ६० दिवसांनी) गैरबीटीमध्ये काही प्रमाणात दिसून येतो.

अन्य किडी : तंबाखूची पाने खाणारी अळी या किडीचा प्रामुख्याने ऑगस्ट महिन्यात प्रादुर्भाव आढळतो. अंड्यातून निघालेल्या अळ्या सामूहिकपणे पानाचा हिरवा भाग खात असल्याने पाने जाळीदार होतात. मोठ्या अळ्या पानाच्या कडेने खातात. अळी कळ्या, पुले व बोंडसुद्धा खाते. या अळीचा प्रादुर्भाव सोयाबीन पिकापेक्षा तुलनात्मक कपाशीवर कमी दिसून येतो. पीक वाढीची अवस्था, कीड प्रादुर्भाव स्थितीनुसार सल्ला १) पेरणीनंतर ६० ते ९० दिवस बोंडअळी २० झाडावर १ किंवा त्यापेक्षा अधिक नुकसान झालेल्या पात्या किंवा बोंड प्रति झाड आढळल्यास, क्लोरॲंट्रानीलिप्रोल (१८.५ एससी) ३ मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. २) पेरणीनंतर ९० ते १२० दिवस बोंडअळी २० झाडांवर १ किंवा त्यापेक्षा अधिक क्षतीग्रस्त पात्या किंवा बोंड प्रति झाड आढळल्यास, (फवारणी प्रति १० लिटर पाणी) फ्लूबेन्डियामाईड (३९.३५ एससी) २.५ मि.ली. किंवा

इंडोक्झाकार्ब (१४.५ एससी) ०.५ मिली. किंवा स्पिनोसॅड (४५ एससी) ३.५ मिली मागील वर्षी बोंडअळीचा प्रादुर्भाव असल्यास ५० मीटर अंतरावर एक याप्रमाणे एकरी ५ कामगंध सापळे लावावेत. त्यातील गॉसिप्ल्यूर दर १५-२० दिवसांनी बदलावा. १० टक्के प्रादुर्भावग्रस्त फुले किंवा बोंडात जिवंत अळ्या असल्यास किंवा गुलाबी बोंडअळी नर पतंग ८ प्रति सापळ्यात सलग ३ रात्री सापडल्यास, (फवारणी प्रति १० लिटर पाणी) थायोडीकार्ब (७५ टक्के डब्ल्यूपी) २० ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस (२५ टक्के एएफ) २५ मिली किंवा

प्रोफेनोफॉस (५० टक्के ईसी) २० मिली

गुलाबी बोंडअळी : १० टक्के प्रादुर्भावग्रस्त फुले किंवा बोंडात जिवंत अळ्या असल्यास किंवा गुलाबी बोंडअळी नर पतंग ८ प्रति सापळ्यात सलग ३ रात्री सापडल्यास, (फवारणी प्रति १० लिटर पाणी) तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव असल्यास अंडीपुंज व अळ्यांचे समूह पानासहित हाताने गोळा करून नष्ट करावेत. निंबोळी तेल ५ मिली प्रतिलिटर + ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टिन आधारित कीटकनाशक (५० हजार पीपीएम) १ मिली + धुण्याचा सोडा १ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. अत्यावश्यक भासल्यास, (फवारणी प्रति १० लिटर पाणी) क्लोरॲंट्रानीलिप्रोल (१८.५ एससी) ३ मिली किंवा नोव्हॅलुरॉन (१० टक्के इसी) १० मिली

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
- १६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
- १८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
- १८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
- १९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
- १९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
- १९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
- १९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
- २००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
- १५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
- १७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
- १८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसत्थी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
- १८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
- १८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
- १८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
- १८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
- १९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
- १९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
- १९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
- १९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
- १९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
- १९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
- १९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
- १९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
- १९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
- १९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
- १९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची 'चाफा बोलेना, चाफा चालेना ' ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
- १९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
- १९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
- १९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
- १९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
- १९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
- २००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
- २०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
- २०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)

स्वाराती रुग्णालयात रुग्ण आणि नातेवाईकांना प्रवेशपत्र झाले बंधनकारक

कोलकाता आणि रत्नागिरी येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा स्वागतार्ह्य निर्णय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांना सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेशपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांवर उपचार करताना येणारे अडथळे कमी करणे आणि त्यांना आराम मिळावा यासाठी स्वाराती प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

अल्पदरात मिळणाऱ्या सुयोग्य उपचारांमुळे बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णही अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उचार घेण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे येथे रुग्णांची आणि नातेवाईकांची प्रचंड वर्दळ असते. आंतररुग्ण कक्षात रुग्ण उपचारासाठी थांबल्यास भेटण्यासाठी येणारे नातेवाईकही गर्दी करतात. त्यामुळे रुग्णांना संसर्गाची भीती असते, तसेच त्यांच्या आरामातही व्यत्यय येतो. एखाद्या रुग्णास सतत नातेवाईक भेटण्यासाठी ये असल्यास त्याचा त्रास त्या कक्षातील अन्य रुग्णांनाही होतो. त्यामुळे या गर्दीला आळा घालणे आवश्यक झाले आहे. तसेच, मागील काही दिवसात कोलकाता येथील महिला डॉक्टर आणि रत्नागिरी येथील परिचारिका यांच्यावर अत्याचाराच्या निंदनीय घटना उघडकीस आल्या. त्यामुळे डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांचे हित लक्षात घेता आणि आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त व न्यायालयाने रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांच्यासाठी प्रवेशपत्र पद्धत (पास सिस्टीम) कार्यान्वीत करण्याबाबत सूचीत केले होते. त्यानुसार स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पास सिस्टिम कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे.

प्रत्येक रुग्णासाठी मिळणार दोन प्रवेशपत्र

स्वाराती रुग्णालयात आंतररुग्ण कक्षात उपचार घेत असलेल्या रुग्णासोबत असलेल्या दोन नातेवाईकांना पास देण्यात येईल. या पासची वैधता ही पाच दिवसाकरीता असेल, त्यानंतर आवश्यकता असल्यास नव्याने पास घेणे बंधनकारक असणार आहे. रुग्णालयात येणारे नागरिक, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, रुग्ण आणि नातेवाईकांनी प्रवेशपत्र पद्धतीचे पालन करून सहकार्य करावे आणि आपल्या रुग्णासह अन्य रुग्णांचीही काळजी घ्यावी असे आवाहन अधिष्ठाता दो. धपाटे यांनी केले आहे.

जैतापूर येथे श्री संत भगवान बाबा जयंती उत्सव साजरा

ग्रामस्थांच्या वर्गणीतून बाबांचे भव्य मंदिर उभारणार

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जैतापूर येथे राष्ट्रसंत श्री भगवान बाबा जयंती शुक्रवारी साजरी करण्यात आली. कीर्तनासह सामाजिक व धार्मिक प्रबोधनाचा कार्यक्रम याप्रसंगी पार पडला. ह.भ. प. अतुल महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. माजी जि प सभापती जयसिंह सोळंके, जय भगवान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप,ओबीसी नेते माधव निर्मळ,उद्योजक सुग्रीव कराड युवा नेते भागवत दराडे यांच्यासह धारूर तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक याप्रसंगी उपस्थित होते. जैतापूर ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून गावात राष्ट्रसंत भगवान बाबांचे भव्य मंदिर उभारण्यात येणार आहे.

राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंतीच्या औचित्याने राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मंदिराची उभारणी जैतापूर येथे करण्यात येणार आहे. जय भगवान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी समस्त गावकऱ्यांच्या वर्गणीतून हे मंदिर स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. गावातील महिला भगिनींसह ग्रामस्थांनी आठ लाख रुपयांची वर्गणी या कार्यक्रमात जाहीर केली.

लवकरच मंदिराच्या बांधकामाची सुरुवात होणार असून राष्ट्रसंत भगवान बाबा जयंतीच्या औचित्याने गावात मंदिर होणार असल्यामुळे उत्साहाचे वातावरण जैतापूर ग्रामस्थात होते. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन सरपंच छाया भागवत दराडे यांच्यावतीने करण्यात आले होते. कैलास दराडे, अशोक दराडे, प्रकाश दराडे, हनुमंत दराडे,महेश चौरे,विष्णू दराडे, गणेश दराडे , सुशील दराडे, तुकाराम दराडे, हनुमंत दराडे, गोविंद दराडे ,सुरेश दराडे, संजय चव्हाण,गोविंद चव्हाण, अनिल दराडे,बाळासाहेब राठोड, व्यंकटी दराडे, बबन दराडे, गोविंद दराडे, बिबीशन दराडे, राजेभाऊ दराडे यांनी या कार्यक्रमाच्या आयोजन केले होते

विविध मागण्यासाठी धारूर तहसील कार्यालयावर मोर्चा

धारूर । प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली धारूर शहरात तहसील कार्यालया वर शुक्रवारी आक्रोश मोर्चा काढण्यात आला संविधानीक हक्का साठी व तालुक्यातील महत्वाचे प्रश्ना वर हा मोर्चा काढण्यात आला तहसीलदारला मागण्याचे निवेदन देण्यात आले मोर्च्यातील घोषणाणी शहर व तहसील परीसर दणाणुण गेला होता.

हा मोर्चा छ शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरु करण्यात आला यात आरक्षणासह माजलगाव मतदार सांघातील गोरगरीब लोकांच्या संविधानिक योजना कोण हडप करत शिपाई ते अधिकारी आमदार यांच्या पर्यंत दलाली दिल्याशिय काम होत नाहीत याचा विचार करा आज कामगार निराधार भूमिहीन शेतकरी गायरानधारक विधार्थी यांचा वालीच चोर आहे खाजगीकरण करून आरक्षण संपवल जात आहे तर दुसरीकडे आरक्षणाला राजकीय वळण देऊन संविधान धोक्यात आणत महाराष्ट्रात जातीवाद निर्माण केला जात आहे महिला अत्याचार वाढत असताना सरकार तुगलकी भूमिका घेत गोरगरिबांच्या जीवनाशी खेळत आहे त्याच बरोबर स्थानिक धारूर वडवणी त लोकांच्या पाण्याच्या योजना एमआयडीसी धारूर घाट रुंदीकरण आरोग्य सेवा बोगस रस्ते या बाबत तातडीने तीन दिवसात निर्णय घ्या नसता पुन्हा हजारो समर्थक बरोबर घेऊन तहसीलदार कार्यालयाला कूलपं ठोकून आंदोलन छेडण्याचा इशारा या मोर्चेतून डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिला आहे हा मोर्चा सरकार विरोधात असल्याचे सांगत सरकार ने भानावर यावं लोकांच्या संविधानिक अधिकार योजना बाबत चालढकल करू नका नसता याद राखा असा इशारा देत प्रशासनाला आपल्या विविध मागण्याचे निवेदन दिले या मोर्चात प्रशांत ओव्हाळ राकेश सिरसाठ किरण शिंदे दया वागमारे तुषार भालेराव अमोल शिरसाठ शिरपती ओव्हाळ अविनाश घायाळ विशाल ओव्हाळ सुनील गायसमुद्रे अशोक भालेराव महेश शिरसाठ अनिल गायकवाड सचिन साळवे हिरामण काळे सुनीता जाधव समीर शेख अकबर शेक अशोक वालेकर वाजेद शेख आकाश जाधव यांच्यासह डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच चे हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

रोषणपुरी फाटा येथे दोन तास रास्तारोको

माजलगांव । प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक खेडी गावांमध्ये लोकांना ये जा करण्यासाठी रस्ताच नाही तर काही ठिकाणी थातूरमातूर रस्त्याचे काम करून गुत्तेदारासह अभियंता,कर्मचाऱ्यांचे पोट भरण्यासाठी थातूर मातूर काम केले जातात.माजलगाव तालुक्यात असे काही ठिकाण आहेत जे की रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात आलेले नाहीत.

काही ठिकाणचे खड्डे बुजवण्यात आले नाही तर काही ठिकाणी केलेल्या कामाचे काम हे निकृष्ट दर्जेआचे झाले आहेत असे ठिकाणे खालील प्रमाणे रोशनपुरी ते छोटेवाडी रस्त्याचे मजबुतीकरण करणे राष्ट्रीय महामार्ग ते रोशनपुरी नागडगाव रोड रस्त्याचे खड्डे बुजवणे, राष्ट्रीय महामार्ग ते रोशनपुरी दोन महिन्यापूर्वी झालेल्या डांबरीकरणाची कॉलिटी कंट्रोल तर्फे तपासणी करणे या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण निर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय महामार्गावरील रोषणपुरी फाटा येथे दोन तास रोको आंदोलन करण्यात आले.या वेळी सुमीत ईगळे, नामदेव,रामा सरवदे,बालाजी जाधव,सौरभ वाघमारे,आबा शेटे, अभिजीत जाधव, संजय जाधव, अनिल कांबळे, करण ढगे,आदीसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.या रास्ता रोकोमुळे राष्ट्रीय महामार्गावरील रोषणपुरी फाटा येथे मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

बीड : जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांचे स्वागत करताना यशवंत सेना राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब दोडतोले,बाबुराव गडदे, राजेश शिंदे, अंकुश सलगर.

वादग्रस्त वक्तव्यामुळे मुस्लिम बांधव उतरले रस्त्यावर

धारूर । प्रतिनिधी

इस्लाम धर्मातील शेवटचे पैगंबर आणि संपूर्ण जगात शांतता आणि सलोख्याचा संदेश देणारे खरे तारणहार हजरत मोहम्मद साहेब यांच्या जीवन चरित्रावर बोट दाखवून वादग्रस्त विधान करणाऱ्या रामगिरी महाराजांना तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी आज शुक्रवारी नमाजानंतर शेकडोंच्या संख्येने मुस्लीम समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन संताप व्यक्त केला.आम्ही आमच्या पैगंबराचा अपमान अजिबात सहन करणार नाही या साठी धारूर शहर पोलिस ठाण्याच्या आवारात रामगिरी महाराज यांच्या अटकेची मागणी करत जोरदार घोषणाबाजी करत मुस्लिम

बांधवांनी पोलीस ठाण्यात जाऊन निषेध व्यक्त करण्यासाठी शहर पोलीस ठाण्यात निवेदन दिले व आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी केली. रामगिरी महाराजांचा यांच्यावर मुस्लिम समाजाचा आरोप आहे की हजरत मोहम्मद साहिब यांच्या जीवन आणि चारित्र्याचे भान न ठेवता शिवीगाळ करून त्यांच्या चारित्र्यावर बोट उचलल्याचे मुस्लिम समाजाचे म्हणणे आहे.आम्ही आमच्या पैगंबराचा अपमान अजिबात सहन करणार नाही.रामगिरी महाराजांसारखे लोक जातीय एकतेच्या या देशात विष कालवत आहेत आणि गटांमध्ये वैर आणि द्वेषाची बीजे पेरत आहेत. देशाची शांतता भंग करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक अपमानास्पद शब्द वापरून ते समाजात उन्माद निर्माण करत आहेत. रामगिरी महाराज सारखे लोक असे विषारी विष पसरवून समाज भडकवण्याचा प्रयत्न करत असून त्यांना शासनाने तात्काळ अटक करावी अशी मागणी समस्त मुस्लिम समाजाच्यावतीने पोलिस निरीक्षक वाघमोडे यांच्या कडे करण्यात आली.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टि-स्टेटद्वारे सहकार गौरव पुरस्कार सोहळा २०२३ दि.८ व ९ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट ही संस्था भारतातील सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे शासकीय धोरण ठरवणे व सहकार क्षेत्रात काम करत असताना येणाऱ्या अडचणी राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचे काम करते.राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे विद्यमान अध्यक्ष सुरेश वाबळे तर उपाध्यक्ष अंकलकोटे पाटील हे काम पाहतात.

राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या वतीने सहकार चळवळीमध्ये आपले योगदान देणारे व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करून कार्य करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करून संस्थांना विविध पुरस्काराने सन्मानित केले जाते.सन २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षामध्ये २०१ ते ५०० कोटी ठेवी या गटामधून दिला जाणारा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार हा श्री मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगाव संस्थेस जाहीर झालेला आहे.या पुरस्काराचे वितरण दिनांक ०९ सप्टेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या सहकार परिषदेमध्ये केंद्रीय निबंधक आनंद कुमार झा यांच्या शुभहस्ते व फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे अध्यक्ष सुरेश वाबळे यांच्या उपस्थितीमध्ये वितरित केले जाणार आहे.श्री मंगलनाथ मल्टीस्टेट माजलगाव या संस्थेला यापूर्वी देखील अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले असून श्री मंगलनाथ मल्टी स्टेटने महाराष्ट्रातच नव्हे तर देशात माजलगाव शहराचा नाव लौकिक केले आहे.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री आर जी कानडे यांचे अचूक मार्गदर्शन व व्यवस्थापकीय संचालक ऑड रवींद्र कानडे यांच्या कौशल्यपूर्ण व्यवस्थापनाने संस्थेने उल्लेखनीय कार्य करत पुरस्काराचा मान संस्थेस प्राप्त केला आहे.मार्च २०२३ अखेर ५४५ कोटी पेक्षा अधिक व्यवसाय पूर्ण केला आहे.केवळ व्यवसाय वाढ हे उद्दिष्ट न ठेवता सुरक्षित व्यवसाय या उद्देशाने १४० कोटी पेक्षा अधिक सुरक्षित सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवींना सुरक्षा देण्याचे काम संस्थेने केले आहे.या सर्व बाबीची दखल घेत राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटने संस्थेला सन २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर केला आहे.संस्थेचे अध्यक्ष मां आर.जी.कानडे यांनी सदरील पुरस्कार संस्थेचे संचालक मंडळ,कर्मचारी,नित्यनिधी प्रतिनिधी, ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक सभासद यांना समर्पित केला आहे.

आयुर्वेदास राजाश्रय मिळाला नाही ही खंत-डॉ. रवींद्र गोरे

पाटोदा । प्रतिनिधी

आयुर्वेद हे एक अतिप्राचीन वैद्यकशास्त्र आहे परंतु काळाच्या ओघात आयुर्वेदास योग्य असा राजाश्रय न मिळाल्यामुळे या अत्यंत प्रभावी अशा चिकीत्सापद्धतीचा गतकाळात म्हणावा तसा प्रचार व प्रसार होऊ शकला नाही असे प्रतिपादन पाटोद्याचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रविंद्र गोरे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या कर्मचारी कल्याण समिती व रसायनशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने ३० ऑगस्ट रोजी आयोजित कर्मचारी उद्बोधनपर व्याख्यानात ते प्रमुख अतिथी वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, अनिल जोगदंड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथी व्याख्यात्यांचा परिचय डॉ. अशोक नागरगोजे यांनी करून दिला. 'आयुर्वेदाचे महत्व' या विषयावर आयोजित या व्याख्यानात डॉ. रविंद्र गोरे पुढे म्हणाले कि, आयुर्वेद म्हणजे जीवनाचे विज्ञान होय. आयुर्वेदशास्त्र अमृतासारखे आहे, ते सर्व आजारांवर काम करते व रोगाचे समूळ उच्चाटन करते. रोग झाल्यावर उपचार करण्यापेक्षा रोगप्रतिबंध करण्यात आयुर्वेद प्रसिद्ध आहे. गत अनेक वर्षांपासून पाश्चात्य देशांमध्ये आयुर्वेदशास्त्राचा प्रचार व प्रसार झालेला असून भारतात मात्र इतर आधुनिक उपचारप्रणालींवर अधिक विश्वास ठेवला जातो हे दुर्दैव आहे. याप्रसंगी विविध उपयुक्त वनौषधीचा वापर, योग्य आहार, व्यायाम व योगासने, रोगप्रतिकार शक्तीची वाढ, दैनंदिन दिनचर्येत आहार सेवन व वेळेचे महत्व, ऋतुमानाप्रमाणे आहारात बदल यासह पंचतत्वे व पंचकर्म यावर डॉ. गोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन करत उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. प्रातिनिधिक अध्यक्षीय समारोप व आभारप्रदर्शन प्रो. सतिष माउलगे यांनी केले. व्याख्यानास शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

बदामराव पंडित निर्मळ मनाचा माणूस - सयाजी जायभाये

रेवकी-देवकीत शिवसैनिकांचा मेळावा

गेवराई । प्रतिनिधी

रेवकी-देवकी सर्कल हे बदामराव पंडितांचे कुटुंब आहे. आज गेवराई विधानसभा मतदारसंघात हौसे, गौसे आणि नवसे कितीही उमेदवार उभा राहिले तरी गोरगरिब आणि अठरा पगड जातीतील लोकांसाठी प्रामाणिक काम करणारे बदामराव पंडित हे कपटी नसून निर्मळ मनाचा माणूस असल्याची जाणीव आता सगळ्यांनाच झाल्याने, यावेळी त्यांनाच आमदार करण्याचा निर्णय तमाम गेवराईकरांनी मनातून घेतला असल्याचे स्पष्ट प्रतिपादन फौजी सयाजी जायभाये यांनी केले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई तालुक्याचा झंजावती दौरा केला असून, अंतिम टप्प्यातील रेवकी- देवकी या जिल्हा परिषद सर्कल मध्ये दिनांक ३० ऑगस्ट २०१४ मेळावा घेऊन शिवसैनिक व पदाधिकारयांशी संवाद साधला. याप्रसंगी युवानेते रोहित पंडित, युवानेते अभयसिंह पंडित, माजी सभापती पंढरीनाथ लगड, रमेश ढवारे, शिवाजीराव घाडगे, किसनराव भुसे, सखाराम मुगुटराव, अमोल सुतार यांची प्रमुख उपस्थिती

होती. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, रेवकी-देवकी जिल्हा परिषद सर्कल मध्ये येणाऱ्या प्रत्येक गावातील बहुतांश लोकांशी माझे वैयक्तिक संबंध आणि संपर्क आहे. या सर्कलने नेहमीच मला भरभरून पाठबळ दिलेले आहे.

विरोधकांनी तालुक्यातील लोकांचे चांगले तर नाही पण वाईट नक्की केले आहे. हे विरोधक पुन्हा सत्तेत आले तर तालुक्याची पुन्हा हुकूमशाहीकडे वाटचाल होईल अशी स्थिती आहे. तुम्ही ज्यावेळी मदतीसाठी मला हात दिली त्याच्या वेळी मी आमदार नसतानाही तुमच्यासाठी सदैव धावून आलो आहे. आता मला तुमच्या आशीर्वादाची गरज आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने प्रत्येक मतदारांपर्यंत जावून माझा नमस्कार सांगावा. ते तुम्हाला चहा पाजून मतदान देतील असा विश्वासही बदामराव पंडित यांनी व्यक्त केला.

यावेळी रोहित पंडित, अभयसिंह पंडित, पंढरीनाथ लगड, किसनराव भुसे आणि सयाजी जायभाये यांची विरोधकांचा समाचार घेणारी रोखठोक भाषणे झाली. कार्यक्रमास बप्पासाहेब सरगर, राहुल सौंदलकर, राजू बाबरे, भाऊसाहेब शिंदे, सुरेश काळे, हरिभाऊ गव्हाणे, महादेव शिंदे, दीपकराव सोंदलकर, गुजाबा वाघमोडे, कानिफनाथ नागरे, रवी सिरसाट, बाळू गायके, शिवाजी येवले, वाजेद भाई, भीमा संगम, रुस्तुम मासाळ, दत्ता पराड, नंदू पारेकर, बंडू मीरपगार, चंद्रसेन जाधव, सखाराम सौंदलकर, गणेशराव मार्गे, बाबुराव डाके, सय्यद शाबुद्दीन, राजाभाऊ टकले, राजू वावरे, सौंदलकर, रवीन सौंदलकर, घनश्याम सजगणे, गोवर्धन चोरमले, लक्ष्मण चोरमले, वसीम सय्यद, शरद पंडित, गव्हाणे हरिभाऊ, कैलास राठोड, आबा शिंदे आदिम सदस्यसैनिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसंतदादा पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र गोरे उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य व प्रमुख अतिथींच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य व क्रीडा निदेशक किशोर मचाले, उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, क्रीडा विभागाचे डॉ. विनोद पवार, डॉ. सय्यद शानूर, डॉ. तानाजी आगळे, मराठी विभागप्रमुख प्रो. हमराज उईके, डॉ. काकासाहेब पोकळे, ग्रंथपाल जगन्नाथ पटाईत, डॉ. अशोक नागरगोजे, डॉ. न. पु. काळे, प्रा. दिनेश शिंदे, डॉ. जालिंदर लोणके उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. सय्यद शानूर यांनी मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल थोडक्यात भाष्य केले. आभारप्रदर्शन डॉ. विनोद पवार यांनी केले.

मागील वादाची कुरापत काढत भर रस्त्यावर धारधार शस्त्राने जीवघेणा हल्ला

अनु.जा./जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

धारूर येथील शिवाजी महाराज चौक येथील आई मेडिकलचे समोर केज रोड येथे जुन्या भांडणाची कुरापत काढुन फिर्यादी रविंद्र उत्तम सिरसट,वय ४५ वर्षे, रा.धारूर यास दहा ते बारा जणांनी लाठ्या-काठ्या व धारधार शस्त्राने जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.सदरची घटना दि.२३/०८/२०२४ रोजी घडली.

याबाबत माहिती अशी की,सर्व आरोपींना फिर्यादीची ''महार''ही जात माहीत असुनही त्यांनी सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करत ह्या महारड्याचि आता जिरवायचि, लई माजलाय हा,असे म्हणत लाठ्या-काठ्या व धारधार शस्त्राने जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.दि.२३/०८/२०२४ रोजी फिर्यादी हा त्यांचे शेत नामे हाडुळा तंदळवाडीरोड येथे असताना कल्पना अनंत जाधव हीचा सायंकाळी ६ वा.चे सुमारास फोन आला व म्हणाली की,आई मेडीकल केज रोड येथे तीला मारहाण करण्याची शक्यता आहे.तुम्ही लवकर या असे म्हणाली असता फिर्यादी मोटार सायकल पॅशन प्लस.क्र. ४४, ७९६२ वरुन शिवाजीचौक धारुर येथील आई मेडिकल येथे ६.०५ वाजता आला असता तेथे लोकांचा जमाव जमलेला होता.यावेळी कुलदीप बाबासाहेब जगताप रा. आवरगांव,महेश देशमुख रा.आवरगांव या दोघांनी कल्पना अनंत जाधवला मारहाण करत अश्लील भाषेत शिवीगाळ करत होते.त्यांना हे मारहाण का करता?असे विचारले असता तरी ते कल्पना जाधव यांना मारीत होते. लागलीच इतर अनोळखीचे तिन लोक हे लाथाबुक्क्याने फिर्यादीस शिवीगाळ करत ह्या महारड्याचि आता जिरवायचि, लई माजलाय हा.असे म्हणत लाठ्या-काठ्या व धारधार शस्त्राने जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.डॉ.महेश देशमुख हा बांबुच्या मोठ्या काठीने मारत होता व धावुधावु अंगावर येत होता.त्यानंतर फिर्यादीस कसब्यातील जाडेला व्यक्ती नामे शिनगारे म्हणाला की,तु इथे का आलास?असे म्हणत जोराचा धक्का दिल्याने फिर्यादी खाली पडला व फिर्यादीचा मोबाईल कुलदीप जगताप याने स्वतःकडे घेतला. फिर्यादीने विचारपुस केली मोबाईल परत द्या.तेव्हा कुलदीप बाबासाहेब जगताप, डॉ.महेश देशमुख,रुपेश अशोक जाधव,टक्कल असलेला जाधव,बाळु वेताळ व इतर पाच अनोळखी व्यक्ती यांनी धक्काबुक्की सुरु केली. फिर्यादी यास जातीवाचक शिवीगाळ करुन लाथा बुक्क्याने मारहाण केली. त्यानंतर कुलदीप जगताप व महेश जाधव,रुपेश जाधव हे मला म्हणाले की,या महारड्याला जिवच मारून टाकु.हा लईच अर्ज करतो.परत लाथाबुक्क्याने मारहाण चालु केली व जातीवाचक शिवीगाळ केली.त्यानंतर महेश देशमुख याने बांबुने पायावर पाठीमागुन मारहाण सुरु केली.त्यामुळे मला मुक्का मार लागला. त्यावेळी कोणीतरी मला पाठीमागुन माझे उजव्या हाताचे कोप-यावर लोखंडी रॉड मारला व हात फ्रॅक्चर करुन डोक्यात गंभीर दुखापत झाल्याने सात टाके पडले. तसेच फिर्यादी खाली पडला तेव्हा एटीएम मधुन चार पाच दिवसापुर्वी तिस हजार काढले होते.त्यातील शिल्लक असलेले दहा हजार रुपये खाली पडले व एसीजेपीचे लेटरपॅड पण खाली पडले.ते लेटरपॅड कुलदीपने आपल्या पायदळी तुडवले.त्या लेटर पॅडमध्ये संघटनेचा लोगो व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आहे.तो म्हणाला की,हे तुझा बाबासाहेब आंबेडकर माझ्या पायाखाली बघ कसा तुडवतो.ते लेटरपॅड ताब्यात घेण्यासाठी फिर्यादी पुढे सरकला असता महेश देशमुख याने समोरुन येवुन दोन्ही हाताने बांबुची काठी घेवुन फिर्यादीचे पाठीत मारहाण केली व शेजारी असलेल्या लोकांनी पण काठीने व लाथाबुक्क्याने मारहाण चालु केली.नंतर त्याचे डोक्यात जोरजोरात लाथा घातल्या व डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण केली.त्यामुळे डोक्याचे मागच्या बाजुस गंभीर जखम झाली.नंतर माझ्या मानेवर बांबूच्या काठीने मारहाण केली.तेथे फिर्यादी बेशुध्द पडला.थोड्या वेळाने फिर्यादी उठुन पाहीले असता जमाव पांगला होता.आई मेडीकल वाल्याने मेडीकल बंद केले व मोबाईल बघत असताना कुलदीप म्हणाला की,आम्ही मराठे एकदा वस्तु घेतल्यावर परत करीत नाहीत. या महारड्या सारखी लाचार जिंदगी जगत नाहीत.आम्ही एकतर ठार मारतोत आता तरी तु धडा घे.जर तु ही फिर्याद केलीस तर पुढे तुला व तुझ्या कुटुंबीयाला सर्व मराठा समाज एकजुट होवुन तुमचा घातपात करून टाकु.तु तुझी जुन २०२४ महीण्यातली अट्रोशिटीची फिर्याद वापस घे,असे म्हणाला. फिर्यादी वापरत असलेला मोबाईल कुलदीप घेवुन गेला.सदर भांडणाचा प्रकार उत्तरेश्वर महादेव जाधव रा.धाराशिव जात मराठा याचे सांगण्यावरून झालेला आहे.या घटनेचे साक्षीदार कल्पना अनंत जाधव व विल्सन उंबरे हे परळीहुन धारूर कोर्टात हजर रहाण्यासाठी आले होते. कोर्टातुन परत जाताना हा प्रकार घडला.त्याचे साक्षीदार आहेत.तेथुन फिर्यादी केज डिवायएसपी ऑफीस येथे गेला तेथे साहेब नसल्या करणाने तो तेथे असलेल्या पिएसआय शेळके यांना घटना सांगीतली. त्यानंतर त्यांनी धारुर पोलीस स्टेशनला फोन करुन कार्यवाही करण्यास सांगीतले.तेथुन फिर्यादीस धारुर पोलीस स्टेशनने पत्र दिल्याने सरकारी दवाखान्यात धारुर येथे गेलो असता तेथील डॉक्टरांनी फिर्यादीला प्राथमीक उपचार करून अंबाजोगाई येथे पाठवीले.तेथे उपचार करुन २५/८/२०२४ रोजी पो.स्टे.ला येवुन फिर्यादीने नामे कुलदीप बाबासाहेब जगताप,डॉ.महेश देशमुख दोन्ही रा.आवरगांव, रुपेश अशोक जाधव,टक्कल असलेला जाधव,बाळु वेताळ तिघे रा.धारूर,उत्तरेश्वर महादेव जाधव रा.धाराशिव,जाडेला व्यक्ती शिनगारे व इतर पाच अनोळखी व्यक्ती यांचे विरुध्द गुन्हा र.नं.२४४/ २०२४, भारतीय न्याय संहिता ब ३०४(२) प्रमाणे कलम ११५ (२)११७ (२), ११८(१), ३०४(२), ३०३(१), १८९(२), १९१(२), १९३(३), १८९(४), १९० तसेच अनुसूचित जाती व जमाती प्रतिबंधक कायदा१९८९ अन्वये ३(१)(),३(१)(),३(१)(), ३(२)() गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दिंद्रुड येथे सर्व समावेशक आण्णाभाऊ साठे जयंती

सर्व जाती धर्मातील तरुणांचा कौतुकास्पद उपक्रम

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची आगळीवेगळी जयंती साजरी होत आहे. महापुरुषांना जातीच्या बंधनात न अडकवता सर्वांनी मिळून जयंती साजरी करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह व कौतुकास्पद आहे. वेगवेगळ्या जाती धर्मातील तरुणांनी एकत्र येवून लोकशाहीर आण्णाभाऊंचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोसात साजरा करण्याचे ठरवले आहे. महाराष्ट्राचे महागायक चंदन कांबळे व जानू विना रंगच नाय फेम गायिका राणी मस्के यांच्या सदाबहार गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

आजकाल प्रत्येक महापुरुषाची जयंती त्या त्या समाजात साजरी केली जाते. महापुरुषांना आपापल्या जातीच्या बंधनात अडकवणे हे त्यांच्या कार्याला संकुचित करण्यासारखे आहे. कोणत्याही महापुरुषांनी केवळ एका जातीसाठी नाही तर समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी काम केले आहे. त्यामुळे थोर पुरुषांची जयंती ही सर्व समावेशक

व्हावी, यासाठी दिंद्रुड येथे युवा नेते बाबा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व जाती धर्मातील युवकांनी एकत्र येऊन लोकशाहीर साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांची जयंती सार्वजनिकरित्या साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

सत्यशोधक डॉ.आण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव ३१ ऑगस्ट शनिवार रोजी सायंकाळी सहा वाजता जुने बस स्थानकावर होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते बाबा कांबळे यांनी सर्वांच्या सहकार्यातून हा जयंती उत्सव आयोजित केला आहे. या ◀◀ पान ३ वर

कडा शहरात संत सेना महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथे संत शिरोमणी सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कडा व कडा परिसरातुन सर्व नाभिक समाज एकत्र येऊन संत सेना महाराज यांना अभिवादन केले या प्रसंगी आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार भिमराव धोंडे यांनी विशेष अशी उपस्थित दाखवली त्यांचा नाभिक संघ कडा यांच्या वतीने छोट्या खानी सत्कार देखील करण्यात आला.

ह.भ.प.श्री हरी चागुणे यांनी किर्तन रुपी समाजाला प्रबोधन केले व संपत क्षीरसागर यांच्याकडुन ◀◀ पान ३ वर

निसर्गाची किमयाच न्यारी...!

उन्हाळ्यानंतर मनुष्य प्राण्यासह प्राणी, पशुपक्षी आणि निसर्गातील झाडे पावसाची आतुरतेने वाट पाहत असतात. मात्र ज्यावेळी हा पाऊस मेहरबान होतो. त्यावेळी निसर्ग कसा फुलून येतो. सगळीकडे हिरवीगार झाडे डोळ्याला आनंद देतात. सध्या श्रावण महिना चालू आहे. बीड जिल्ह्यातील सौताडा येथील शंकराचे अधिष्ठान असलेले येथील रामेश्वर मंदिर हे जवळपास एक हजार फूट खोल दरीत आहे.या ठिकाणी सुंदर शंकराचे मंदिर आहे. या ठिकाणचा मंदिर परीसर आणि धबधबा अल्हाददायक वातावरण निर्माण करतो. मनाला प्रसन्न करणारा देखावा टिपला आहे शंकर सुरवसे यांनी.

अंबाजोगाईत क्रिडा दिन साजरा

अंबाजोगाई -प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रिडा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर होते.

प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव कमलाकर चौसाळकर हे तर योगेश्वरी प्रबोधिनीचे मार्गदर्शक रमण सोनवळकर परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नागरगोजे,रमेश सोनटकके, प्रा.डॉ.गणेश

जैतापूर येथे श्री संत भगवान बाबा जयंती उत्सव साजरा

ग्रामस्थांच्या वर्गणीतून बाबांचे भव्य मंदिर उभारणार

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जैतापूर येथे राष्ट्रसंत श्री भगवान बाबा जयंती शुक्रवारी साजरी करण्यात आली. कीर्तनासह सामाजिक व धार्मिक प्रबोधनाचा कार्यक्रम याप्रसंगी पार पडला. ह.भ. प. अतुल महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. माजी जि प सभापती जयसिंह सोळंके, जय भगवान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप,ओबीसी नेते माधव निर्मळ,उद्योजक सुग्रीव कराड युवा नेते भागवत दराडे

यांच्यासह धारूर तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक याप्रसंगी उपस्थित होते. जैतापूर ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून गावात राष्ट्रसंत भगवान बाबांचे भव्य मंदिर उभारण्यात येणार आहे.

राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंतीच्या औचित्याने राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मंदिराची उभारणी जैतापूर येथे करण्यात येणार आहे. जय भगवान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी समस्त गावकऱ्यांच्या वर्गणीतून हे मंदिर स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. गावातील महिला भगिनींसह ग्रामस्थांनी आठ लाख रुपयांची वर्गणी या कार्यक्रमात जाहीर केली. लवकरच मंदिराच्या बांधकामाची सुरुवात होणार असून राष्ट्रसंत भगवान बाबा जयंतीच्या औचित्याने गावात मंदिर होणार असल्यामुळे उत्साहाचे वातावरण जैतापूर ग्रामस्थात होते. कीर्तनानंतर ◀◀ पान ३ वर

खोलेश्वर मल्टीस्टेटला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार जाहीर

दिंद्रुड । प्रतिनिधी

शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट द्वारे सहकार गौरव पुरस्कार सोहळा २०२३ दि. ८ व ९ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट ही संस्था भारतातील सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचे शासकीय धोरण ठरवणे व सहकार क्षेत्रात काम करत असताना येणाऱ्या अडचणी राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचे काम करते. राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटचे विद्यमान अध्यक्ष सुरेश वाबळे तर उपाध्यक्ष अंकलकोटे पाटील हे काम पाहतात. राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टीस्टेटच्या वतीने सहकार चळवळीमध्ये आपले योगदान देणारे व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करून कार्य करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करून संस्थांना विविध पुरस्काराने सन्मानित केले जाते.सन २०२२ ते २०२३ या आर्थिक वर्षामध्ये ७६ ते १२५ कोटी ठेवी या गटामधून ◀◀ पान ३ वर

स्वाराती रुग्णालयात रुग्ण आणि नातेवाईकांना प्रवेशपत्र झाले बंधनकारक

कोलकाता आणि रत्नागिरी येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा स्वागतार्ह्य निर्णय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांना सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेशपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांवर उपचार करताना येणारे अडथळे कमी करणे आणि त्यांना आराम मिळावा यासाठी स्वाराती प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

अल्पदरात मिळणाऱ्या सुयोग्य उपचारांमुळे बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णही अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उचार घेण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे येथे रुग्णांची आणि नातेवाईकांची प्रचंड वर्दळ असते. आंतररुग्ण कक्षात रुग्ण उपचारासाठी थांबल्यास भेटण्यासाठी

येणारे नातेवाईकही गर्दी करतात. त्यामुळे रुग्णांना संसर्गाची भीती असते, तसेच त्यांच्या आरामातही व्यत्यय येतो. एखाद्या रुग्णास सतत नातेवाईक भेटण्यासाठी ये असल्यास त्याचा त्रास त्या कक्षातील अन्य रुग्णांनाही होतो. त्यामुळे या गर्दीला आळा घालणे आवश्यक झाले आहे. तसेच, मागील काही दिवसात कोलकाता येथील महिला डॉक्टर आणि रत्नागिरी येथील परिचारिका यांच्यावर अत्याचाराच्या निंदनीय घटना उघडकीस आल्या. त्यामुळे डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांचे हित लक्षात घेता आणि आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त व न्यायालयाने रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांच्यासाठी प्रवेशपत्र पद्धत (पास सिस्टीम) कार्यान्वीत करण्याबाबत सूचीत केले होते. त्यानुसार स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पास सिस्टिम कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे.

प्रत्येक रुग्णासाठी मिळणार दोन प्रवेशपत्र

स्वाराती रुग्णालयात आंतररुग्ण कक्षात उपचार घेत असलेल्या रुग्णासोबत असलेल्या दोन नातेवाईकांना पास देण्यात येईल. या पासची वैधता ही पाच दिवसाकरीता असेल, त्यानंतर आवश्यकता असल्यास नव्याने पास घेणे बंधनकारक असणार आहे. रुग्णालयात येणारे नागरिक, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, रुग्ण आणि नातेवाईकांनी प्रवेशपत्र पद्धतीचे पालन करून सहकार्य करावे आणि आपल्या रुग्णासह अन्य रुग्णांचीही काळजी घ्यावी असे आवाहन अधिष्ठाता दो. धपाटे यांनी केले आहे.

रामगिरी महाराजला अटक केले नाही तर आंदोलन -खुर्शीद आलम

पोलिस अधीक्षकांकडे शिष्टमंडळाने केली मागणी

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त ठरलेल्या रामगिरी महाराज यांनी काहि ही कारण नसताना प्रेषित मुहम्मद पैगंबर(स.आ.स.)यांच्या विषयी अपशब्द वापरून मुस्लिम समाजाचे भावना दुखावल्या आहेत म्हणून बीडचे धार्मिक गुरु आणि सामाजिक लोकांनी मा.पोलीस अधिक्षक साहेबांची भेट घेऊन तक्रार दिली होती, बीड शहर पोलिस ठाण्यात रामगिरी महाराजवर गुन्हे दाखल करण्यात आले होते मात्र गुन्हे दाखल होऊन अनेक दिवस उलटले तरी सुद्धा वादग्रस्त महाराजला अटक केले

गेले नाहीत म्हणून मुस्लिम समाजाच्यावतीने शिष्टमंडळाने खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक मा.अविनाश बारगळ साहेब यांच्याशी चर्चा करून निवेदन दिले आहेत, निवेदनात म्हटलें आहे की रामगिरी गुरू नारायण गिरी महाराज यांनी इस्लामीक धर्म गुरू प्रेषित मुहम्मद पैगंबर (स.आ.स.) यांच्या विरोधात विनाकारण अपशब्दांचे वापर करून सर्व मुस्लीम समाजांचे भावना दुखावल्या आहेत त्यामुळे मानसिक त्रास दिलेला आहे, त्यांच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

अवैध हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा; माजी गृहराज्यमंत्र्यांच्या मुलासह ५ जणांवर

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा परिसरातील एका हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर कोंढवा पोलिसांनी छापा टाकला. याप्रकरणी माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांच्या मुलासह पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाकीर रमेश बागवे (वय ३६, रा. लोहियानगर, भवानी पेठ), हरून नबी शेख (वय २५), बिक्रम साधन शेख (वय २५), अमानत अन्वर मंडल (वय २२) आणि अमानत अन्वर (वय २४, सर्व रा. मालुंचाईस्ट्री थना शांतीपुर जि. नोदीया प. बंगाल) यांच्या विरुद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात सिगारेट व अन्य तंबाकुजन्य उत्पादने अधिनियम २०१८ चे कमल ४(अ) २१ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाकीर बागवे हे हॉटेलचे चालक असून अन्य चौघे तेथील कर्मचारी आहेत. त्यांच्याकडून २३,५०० रुपये किमतीचे तंबाखूजन्य हुक्काचे प्लेव्हर्स आणि काचेचे नऊ हुक्का पॉट जप्त करण्यात आले आहेत.

सहाय्यक पोलिस निरीक्षक अमित शेटे व पोलिस अंमलदार हे कोंढवा भागात पेट्रोलिंग करत असतांना एनआयबीएम रस्त्याच्या परिसरात आलेल्या द व्हिलेज या हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का दिला जात असल्याची माहिती कोंढवा पोलीस ठाण्याच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मानसिंग पाटील व त्यांच्या पथकाने गुरुवारी रात्री या हॉटेलवर छपा टाकून ही कारवाई

पुण्याच्या मुठा नदीतील त्या मृतदेहाचं गूढ उकलेना; पोलिसांना क्लू सापडेना, तपासासाठी आकाशात ड्रोन फिरवला

पुणे । प्रतिनिधी

पुणे: पुण्यात चार दिवसांपूर्वी पुण्यातील मुठा नदीत एका तरूणीची निर्घृण हत्या करून मृतदेहाचे तुकडे करून आली आहे. चार दिवसांपूर्वी पुण्यातील मुठा नदीत वाहून आलेल्या त्या मृतदेहाचं गुढ अजूनही उकलेले नाही. सोमवारी दुपारी पुण्यातील खराडी परिसरातून वाहत असलेल्या मुठा नदीच्या तिरावर एका महिलेचा शिर नसलेला मृतदेह आढळून आला होता. एका महिलेचा निर्घृण खून करून हात, पाय छाटून हा मृतदेह नेमका कोणी आणि कधी नदीत टाकला हे अजूनही समजू शकलेले नाही.

पुणे पोलिसांकडून देखील या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन परिसरात ड्रोनच्या साहाय्याने मदत घेतली जाते आहे. याशिवाय गेल्या ४ दिवसांपासून पुणे शहरासह, पिंपरी चिंचवड आणि ग्रामीण भागात सुद्धा बेपत्ता झालेल्या महिलांचा सुद्धा तपास या अनुषंगाने केला जातोय. पुणे पोलिसांकडून या मृतदेहाचे इतर भाग शोधण्यासाठी ड्रोनची मदत घेतली जात आहे.

या प्रकरणात अज्ञाताविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत तरुणी १८ ते २० वयोगटातील असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हत्येचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरु केल्याची माहिती मिळत आहे. तर मृत तरुणीची कोणालाही ओळख पटवता येऊ नये यासाठी विकृत आरोपीने तरूणीच्या धडापासून तिचे हात-पाय आणि डोकं वेगळं केलं आहे. धारदार शस्त्राच्या सहाय्याने आरोपीने तरूणीचे अवयव कापून तिचे धड नदीपात्रात फेकून दिले असल्याची माहिती मिळत आहे.

पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न?

पोलिसांनी या घटनेबाबत वर्तवलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, अज्ञात इसमाने तरूणीला ठार (झींपश ठीळाश छ्शी) मारून याबाबत पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहाचे धडापासूनचे शीर, दोन्ही हात खांद्यापासून, दोन्ही पाय धारदार शस्त्राच्या सहाय्याने कापून टाकले. त्यानंतर हे धड (झींपश ठीळाश छ्शी) मुळा-मुठा नदीपात्रात फेकून दिले आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीवरोधात चंदननगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

गणेशोत्सवात धोकादायक वीज जोडणी टाळा; महापालिकेचे आवाहन

पुणे - गणेश मंडळांकडून मांडव, कमानी टाकताना वीज जोडणी सुरक्षीतपणे करावे, महापालिकेचे पथदिवे, जंक्शन बॉक्स किंवा फिडरमधून अनधिकृत वीज जोड घेऊ नयेत. यातून जिवीत हानी होण्याची शक्यता आहे. तसेच मांडव उभारणी करताना पथदिव्यांच्या खांबाचा आधार घेऊ नये, पथ दिव्यांपासून मांडव दूर असावा असे आवाहन महापालिकेच्या विद्युत विभागाने केले आहे.

गणेशोत्सवाची तयारीला वेग आला असून, शहरात मंडळांकडून मांडव उभारणे, देखावे तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. त्यापार्श्वभूमीवर महापालिकेने खबरदारीचा उपाय म्हणून याबाबत मंडळांना सतर्क केले आहे. महापालिकेतर्फे शहरातील सर्व पथदिव्यांची तपासणी केली जात आहे. त्यामध्ये शहरात एकही धोकादायक पथदिव्यांचा खांब असणार नाही याची काळजी घेतली जात आहे. तरीही खांबात विद्युत प्रवाह उतरणे, खांब गंजलेला असणे, तुटलेला जंक्शन बॉक्स, फिडर पिलर आढळल्यास नागरिकांनी जवळच्या क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

गणेशोत्सवाच्या काळात महावितरणकडून तात्पुरती वीज जोडणे अगदी अल्प दरात दिली जात आहे. त्यामुळे मंडळांनी अधिकृत वीज जोडणी घेऊन जीवित हानी टाळावी. अनधिकृतपणे वीज जोडणी घेऊन कोणतीही दुर्घटना घडल्यास त्यास महापालिका जबाबदार नाही, असे मुख्य अभियंता मनिषा शेकटकर यांनी सांगितले.

बिबट्याच्या हल्ल्यात ४ शेळ्यांचा मृत्यू

पिंजरा लावण्याची वन विभागाकडे मागणी

पुणे । प्रतिनिधी

वरवंडमध्ये बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. येथील कातोबानगरच्या जानाईमळ्यात बिबट्याने ४ शेळ्यांवर हल्ला करून त्यांचा फडशा पाडला. या घटनेमुळे स्थानिक नागरिक व शेतकरीवर्गामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



कातोबानगरच्या जानाईमळा परिसरात बिबट्यांचा वावर वाढला आहे. या ठिकाणी सातत्याने पाळीव प्राण्यांवर हल्ले होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मागील आठवड्यातच विकास शिवणकर यांची शेळी बिबट्याने फस्त केली. त्यानंतर वन विभागाने ट्रॅप कॅमेरा लावला. या कॅमेर्यातदेखील बिबट्या कैद आढळून आला. मात्र अजूनपर्यंत बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावला नसल्याचे वरवंडचे पोलिस पाटील किशोर दिवेकर यांनी सांगितले.

पुण्यात रावणराज होऊ देणार नाही -अमितेश कुमार

पुणे । प्रतिनिधी

नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरात नऊ हजार पोलीस तैनात आहेत. एकादी जादूची कांडी फिरवली आणि पोलीस घटनास्थळी पोहोचले असे होत नाही. मात्र, आम्ही आमची जबाबदारी टाळत नाही. त्यासाठी आपण आमचे कान आणि डोळे बना. सध्या, तुम्ही देखील जागृत होण्याची गरज आहे. समाजात अपप्रवृत्ती दिसत असेल, समाजकंटक किंवा वाईट घटना घडत असतील तर तुम्ही तत्काळ पोलिसांना माहिती द्या.

मी तुम्हाला आश्वासन देतो की, येथे रावणराज नाही, तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही, अशी ग्वाही पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पुणेकरांना दिली. शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी व महिलांची सुरक्षितता या विषयावर शाळा सुरक्षा परिषद, आयोजीत करण्यात आली होती. यावेळी शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांना मार्गदर्शन करताना अमितेश कुमार बोलत होते.

याप्रसंगी, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक संपत सूर्यवंशी, अपर पोलीस आयुक्त प्रविणकुमार पाटील, मनोज पाटील, सर्व पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. पोलीस आयुक्तांनी शाळांमध्ये जनजागृतीसह अनेक मुद्यांवर महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. पोलिसांकडून भरोसा सेलमार्फत चालणार्या पोलीस काका आणि पोलीस दिदी, दामिनी मार्शल, बडी कॉप, जेष्ठ नागरिक, बाल सुरक्षा पथकामार्फत चालणार्या कामाची माहिती दिली. बालकांच्या सुरक्षेसंदर्भात असलेल्या कायद्यांची माहिती देण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखील पिंगळे यांनी याचे सादरीकरण केले.

टिळक महाराष्ट्र विद्यालय आता केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ हे भारतातील सर्व शाळांसाठीचे राष्ट्रीय शिक्षण मंडळ आहे. केंद्रीय माध्यमिक शैक्षणिक अभ्यासक्रम शाळांमध्ये चालवण्यासाठी सीबीएससी ची मान्यता असणे आवश्यक असते.

ही महत्त्वाची बाब लक्षात घेऊन राष्ट्रीय शिक्षण हेतूने सुरू करण्यात आलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यालयात मागील महिन्यात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून तपासणी करण्यात आली होती. शालेय इमारत, मैदान, शाळेतील कर्मचारी व शिक्षक वर्ग, विज्ञान प्रयोगशाळा, भौतिक शालेय सुविधा या सर्व निकषांना पूर्ण करण्यात आल्याने टिळक महाराष्ट्र विद्यालयाला माध्यमिक स्तरापर्यंतची सीबीएससी मंडळाची मान्यता मिळाली आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यालयाच्या संचालिका डॉ. प्रणती टिळक यांनी सीबीएससी मान्यता क्रमांक ११३१३८१ असल्याचे जाहीर केले. यापुढे विद्यालयातील सर्व शिक्षकांना सीबीएससीचे प्रशिक्षण लाभणार असून त्याद्वारे मुलांचा शैक्षणिक विकास निश्चित होणार आहे. शाळेच्या अध्यक्षा डॉक्टर प्रणती टिळक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षकांच्या एकत्रित कार्यातून हे यश शाळेला प्राप्त झाले आहे.

पुण्यात सुरक्षिततेसाठी लावलेले हजारो उउढत कॅमेरे फक्त लटकवलेलेच; गुन्हेगारांना मिळतेय मोकळीक

पुणे । प्रतिनिधी

मागील काही दिवसांमध्ये पुणे, मुंबईसह राज्यातून अनेक अत्याचाराच्या, खुनाच्या, हत्येच्या घटना समोर आल्या आहेत, या घटनांचा तपास करताना पोलिस प्रामुख्याने परिसरातील सीसीटिव्ही फुटेज चेक करतात, मात्र परिसरातील सीसीटिव्हीचं बंद असतील तर, हो असाच काहीसा प्रकार पुणे शहरात दिसून येत आहे. पुणे शहरात तब्बल १००० सीसीटिव्ही बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

पुण्यातील २५ पोलीस चौकींच्या हद्दीत हे सर्व सीसीटिव्ही कॅमेरे बंद (उउढत लराशीर) असल्याचे निदर्शनास आले आहे. केबल तुटल्यामुळे बहुतांश हे कॅमेरे बंद असल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यात सुरेक्षाच्या आणि बाकी कारणास्तव २ हजार ९०९ सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत मात्र, यातील १०५४ सीसीटीव्ही बंद तर १८५५ कॅमेरे सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

गणेशोत्सवादरम्यान घडतात चोरीच्या मोठ्या घटना

गणेशोत्सव काही दिवसांवर आला आहे, या काळात मोठी शहरात मोठी गर्दी होते. दुरवरून लोक गणेशोत्सव सोहळ्यासाठी पुण्यात येतात. या दरम्यान मोबाईल, सोनं, पाकीट अशा छोट्या मोठ्या चोऱ्या आणि गुन्हे होत राहतात. या पार्श्वभूमीवर शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या दाव्यानुसार सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत, त्याचे नियंत्रण पोलिसांकडे आहे. त्यामुळे शहर परिसरात होण्याऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी त्याची दुरुस्ती करणे अपेक्षित आहे.

ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे यांनी दिले अमोल रावेतकरांना धन्यवाद

पुणे - पदार्पणातल्या ऑलिम्पिक स्पर्धेतच चमकदार कामगिरी करत भारतासाठी कांस्य पदक जिंकणाऱ्या स्वप्नील कुसाळे याने आज अमोल रावेतकर यांच्या प्रभात रस्त्यावरील कार्यालयात त्यांची सदिच्छा भेट घेतली व राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना स्वप्नील कुसाळे म्हणाला, खेळाडू म्हणून जडणघडण होत असतानाच्या काहीजण आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. अगदी त्याच प्रमाणे माझ्या त्या काळात अमोल रावेतकर माझ्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आणि मला प्रशिक्षणासाठी लागणारी मोठी आर्थिक मदत त्यांनी दिली. इक्वीपमेंट, अम्युनेशन, स्पर्धा खेळण्यासाठी होणारा प्रवास यावर बराच खर्च होत असतो. रावेतकर यांनी मदत केल्याने माझा तो भार हलका झाला. अशा प्रकारची मदत जेंव्हा वेळेत मिळते तेंव्हा खेळाडूची कामगिरी नक्की उंचावते.

आज राष्ट्रीय खेळ दिवस आहे दिवस आहे त्यानिमित्ताने उदयोन्मुख खेळाडूंना तुम्ही काय संदेश द्याल असे उपस्थितांनी विचारले असता स्वप्नील म्हणाला, खेळाडूने कायम न्यूट्रीशन आणि फिटनेस वर भर द्यायला हवा. तसेच आपल्या स्वप्नांचा पाठलाग करताना 'वेड लागल्याशिवाय इतिहास घडत नाही' ही मराठी म्हण कायम लक्षात ठेवावी, ध्यास घेवून मेहनत करावी आणि इतिहास घडवावा.

स्वप्नीलने देशासाठी ऑलिम्पिक पदक जिंकून आम्ही त्याच्या वाटचालीत दिलेल्या या योगदानाचे अक्षरशः चीज केले याचा आम्हाला अतिशय आनंद आहे. पहिल्यांदा स्वपील मला भेटला तेंव्हा १९ वर्षांचा एक तरुण, नम्र आणि डोळ्यात मोठी मोठी स्वप्न असणारा खेळाडू म्हणून. त्याची ही स्वभाव वैशिट्ये मला भावली आणि आम्ही त्याला मदत करायचे ठरवले.

तोतया डॉक्टरच्या उपचारामुळे महिलेचा मृत्यू?

इंदापूर । प्रतिनिधी

देविदास दगडू सरडे (रा. सरडेवाडी, ता. इंदापूर) यांच्या फिर्यादीवरून विजय राजेंद्र वलगे (रा. मुंगशी, ता. माढा, जि. सोलापूर) आणि अनिरुद्ध उर्फ निखिल रामभाऊ निंबाळकर (रा. बिटरगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) या दोघांवर इंदापूर पोलीस ठाण्यात १७ ऑगस्ट रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील आरोपी व तोतया डॉक्टर असल्याचा आरोप असलेल्या विजय राजेंद्र वलगे यांना बुधवारी (दि. २८) अटक करण्यात आली आहे. इंदापूर न्यायालयाने त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. ही घटना १७ जुलै २०२३ ते २६ जुलै २०२३ दरम्यान घडली.

कांदलगाव येथील ७, तर इतर ठिकाणच्या एकूण २० महिला व पुरुष विविध धार्मिक स्थळांच्या सहलीसाठी गेल्या होत्या. सहलीदरम्यान ८ जणांना वैद्यकीय उपचारांची गरज असतानाही आयोजकांनी याकडे दुर्लक्ष केले. घटनेत मृत्यू झालेल्या शोभा सरडे यांना उपचारांची नितांत आवश्यकता असतानाही त्यांना रुग्णालयात दाखल न करता आरोपी विजय राजेंद्र वलगे या तोतया डॉक्टरकरवी खासगी औषधालयातील औषधांद्वारे मथुरा (उत्तरप्रदेश) येथील विश्वसेवा वृंदावन आश्रमातच वैद्यकीय उपचार करण्यात आले. परिणामी आरोग्य खालावल्याने तथा आरोपींकडून अयोग्य उपचार, तसेच योग्य उपचार वेळेत न मिळाल्याने २६ जुलै २०२३ रोजी ग्वालियर (मध्यप्रदेश) येथील जे.ए.एच. या शासकीय रुग्णालयात त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला

स्वागतार्ह! महाराष्ट्रातील पहिले तृतीयपंथीयांचे ढोल-ताशा पथक

पुणे । प्रतिनिधी

''गणेशोत्सवात सर्वाधिक आकर्षण असते ते ढोल-ताशा पथकांचे. मलाही त्यात सहभागी होण्याची इच्छा होती. त्यामुळे मी काही पथकांकडे त्याबाबत विचारणा केली. मात्र समाजात जसा बहुतांश ठिकाणी तृतीयपंथीयांना नकार ऐकायला मिळतो, त्याचप्रमाणे इथेही नकार मिळाला. पण याच नकारातून एक प्रेरणा मिळाली आणि त्यातून निर्मिती झाली, 'शिखंडी' या महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी ढोल-ताशा पथकाची,'' ही कहाणी सांगत होत्या मनस्वी गोईलकर या तृतीयपंथी.जसे मुला-मुलींचे, महिलांचे, कलाकारांचे स्वतंत्र ढोल-ताशा पथक आहे. त्याचप्रमाणे मनस्वी यांनी तृतीयपंथीयांचे स्वतंत्र पथक सुरू केले आहे. यंदाच्या गणेशोत्सवात त्यांचे वादन पाहायला मिळणार आहे. मात्र, तत्पूर्वी ढोल-ताशा कसे जमवायचे, सराव कोठे करायचा, प्रशिक्षण कोण देणार आदी अडचणी त्यांच्यासमोर होत्या. त्यावर मात करत 'शिखंडी' ढोल-ताशा पथकाचा चार ऑगस्टपासून मार्केट यार्ड परिसरात सराव सुरू झाला. या पथकाने नांदेड येथे झालेल्या राज्य सरकारच्या राज्यस्तरीय कार्यक्रमामध्ये १६ ऑगस्टला त्यांचे पहिले वादन केले. तृतीयपंथी व्यक्तीही सक्षमपणे आपल्या बरोबरीने उभे राहू शकतात, हा संदेश 'शिखंडी' पथकाने समाजाला दिला. या पथकात शहराच्या वेगवेगळ्या भागांतील सध्या एकूण ३० तृतीयपंथी व्यक्ती आहेत. रोज सायंकाळी पाच ते रात्री आठ वाजेपर्यंत या पथकाचा सराव चालतो. 'शिखंडी' हे पथक सुरू करताना अनेक अडचणी आल्या. मात्र इच्छाशक्ती आणि ठाम विश्वासाच्या जोरावर मार्ग काढत हे पथक सुरू केले. यंदा मानाच्या पाच गणपतींसह दगडूशेठ गणपती समोर आम्ही वादन करणार आहोत. यातून तृतीयपंथी व्यक्तीही सक्षमपणे आपल्या बरोबरीने उभे राहू शकतात, हा संदेश आम्हाला याद्वारे द्यायचा आहे.

महापालिकेच्या दोन रुग्णालयांना नोटीस

पुणे । प्रतिनिधी

जैव वैद्यकीय कचऱ्या संदर्भात नियमांचे पालन न केल्याबद्दल महापालिकेच्या दोन रुग्णालयांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) नोटीस बजावली आहे. रुग्णालयाला नोटीस जारी केल्यापासून एका महिन्याच्या आत एक वेगळे जैव वैद्यकीय कचऱ्या संदर्भात स्टोरेज सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश या नोटीसीतून देण्यात आले होते.

टिंबर मार्केट आणि मित्र मंडळ चौक परिसरात हे रुग्णालय आहे. एमपीसीबीचे प्रादेशिक अधिकारी जे.एस. साळुंखे यांनी ही नोटीस जारी केली आहे. संबंधित रुग्णालये एक महिन्याच्या आत बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट नियम, २०१६ नुसार वेगळ्या जैव वैद्यकीय स्टोरेज सुविधा पुरवणे बंधनकारक आहे तसेच त्याचा वार्षिक अहवाल तसेच सांडपाणी प्रक्रिया सुविधेचा तपशीलही एक महिन्याच्या आत सादर करण्याच्या देखील सूचना मंडळाने दिल्या आहेत. मंडळाने रुग्णालयाला जैव वैद्यकीय स्टोरेजचे रेकॉर्ड राखून ठेवण्याला सांगितले आणि बायोमेडिकल वेस्टचे वर्गवारीनुसार विलगीकरण करून त्याची विल्हेवाट लावेपर्यंत रंगीत कोडेड पिशव्यांमध्ये साठवून ठेवण्यासही सांगितले आहे. बायो मेडिकल वेस्टची पूर्तता न केल्याबद्दल मित्र मंडळ चौक परिसरात असलेल्या रुग्णालयाला देखील मे महिन्याच्या सुरुवातीला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. नोटीस देऊनही रुग्णालयाने निकषांचे पालन केले नाही. रुग्णालयांना जारी करण्यात आले. उपप्रादेशिक अधिकाऱ्यांनी रुग्णालयावर कायदेशीर कारवाई करण्याचा प्रस्तावही सादर केला होता. रुग्णालयलावरील निर्देशांनुसार सात दिवसांच्या आत कृती अहवाल सादर करण्यास सांगितले होते आणि अपयशी झाल्यास, मंडळ प्रक्रियेनुसार पुढील कायदेशीर कारवाई करणार आहे.